# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १३ अकोला, रविवार ता० २ माहे फेब्रुवारी सन १८७९ इसवी. अंक ५


## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणोर लोकाकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

## गांजलेल्यांचा टाहो.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस

वि० वि० खालीं लिहिलेली कविता कृपा करून छापावी.

साक्या.

आजिना फाजिता न करी माझा,
दास पदीं नत आहे
धवे पावे दीनदयाळा,
दुस्तर भावें बुडताहे ॥१॥
तिन्ही लोकहीं फिरतां न दिसे,
त्राता तुजसम कोणीं
भक्तवत्सल्या यास्तव चरणां,
नमतों जोडुनी पाणी ॥२॥
दुष्कर्मी मी दुराचारिही,
यास्तव करिती त्रास ॥
जनीं सर्व ते माझा देवा,
विनवी जरे मी त्यास ॥ ३ ॥
कोणी ह्मणती कपटी लबपटीं,
लेखाया न उचीत ॥
यास्तव जाचे हातीं जितुकें,
करिती ते अनहीत ॥ ४ ॥
ह्मणती आह्मी श्रेष्ठ भ्रष्ट हा.
नको संगती याची ॥
साची न परी साचि दाविती,
रचुनी गोष्ट मनींची ॥ ५
असो त्यांकडे बोल नसे तो,
बोल मजकडे आहे ॥
पूर्वार्जित हे असेच माझें,
ओझें तुजचि न हें ॥६॥
कसें ह्मणुनी जरि पुससि सांगतो,
पतिताचा कैवारी ॥
नीद असे तूं वागविशी मग,
बोलाया का [illegible] ॥ ७ ॥

जडाऽ जडाचा अभिमानी तूं,
काय त्यांत मी नाहीं ।
ह्मणुनी कर्णीं हात ठेविशी,
योग्य नसे हें कांहीं ॥८॥
वाल्या कोळी असुन पातकी ,
झाला ऋषि कैसा तो ॥
अजामिळादी असंख्य तरले,
ऐसें ऐकत होतों॥९॥
देवा सर्व मला हें आतां,
खोटें वाटत आहे,
स्तुतिप्रिया तुज स्तुती आवडे,
रिझविशि जग तेणें हें ॥१०॥
साधू संत अनंतहि पुजिले,
न चले त्यांचें कांहीं ॥
पातक ऐसें अती संचलें,
हंता तुजविण नाहीं ॥११॥
ह्मणुनी पायीं मिठी मारतों,
तारी या दीनातें॥
स्मरुनि प्रभु तूं सेवक मी हें,
परंपरागत नातें ॥१२॥
स्पर्शी हातें मस्तक माझा,
देउनिया अभयातें ॥
इच्छा पुरवी मनांत जी कीं,
गाइन त्वच्चरितातें ॥१३॥
कृत त्रेत द्वापार कली,
फिरती असंख्य फेरे॥
परी तुझें वा विपळ चक्र जें,
फिरे अंशता सारे ॥ १४ ॥
गणिता न कळे गणित जयाचें
काय विधीचा पाड ॥
तेथें मी तो क्षुल्लक प्राणी
काय वर्णु जें धेंड १५
अनंत कोटी ब्रह्मांडाची,
वस्ती रोमीं ज्याचे ॥
केवि मूढ मी वर्णुं जगता
जो आधार तयातें ॥ १६ ॥
पक्ष्यां न कळे अंत गगनिचा
परि ते उडती गगनीं
तसा प्रयत्न हा समजावा कीं,
प्रभु तूं सर्वज्ञानी ॥१७॥
अनेक चक्रें घडीमाजि ते,
कळा एकची सारी।
तशींच चक्रें कीं भूतें हीं,
गतियां तूं निर्धारी॥१८॥
अनंत शक्ती त्या भूतांतें,
वेग वेगळी येते।
त्या योगानें उत्पत्ति स्थिति,
लय हें सर्वहि होतें॥१९॥
जे दृष्टीनें पहात आलों,
किंवा जें पहाणार।
तें तें सर्वहि नाश पावतें,
ऐसा हा निर्धार॥ २० ॥
फार काय पण भासहि जो कां,
तो हो विलया जातो।
नसे शून्यहि शून्यातितहो,
काय वर्णु तूं जो तो ॥२१॥
जरी ह्मणावें नीच पातकी,
आहे मी यासाठीं ।
न ये दया तुज या दीनाची,
भक्त वत्सला पोटीं॥२२॥

परी असेंही सत्य न ह्मणवे,
सदा सारखी प्रीती।
वृक्ष जसा दे लावी तोडी,
त्या दोघां विश्रांती ॥ २३ ॥
अथवा तोय जसें त्या दुष्टा
सुष्टा एकीच भावें ।
होई न कधीं मधुर क्षारहि
लागे मूळस्वभावें २४
पहा क्षितीते एक पूजितो
एक खोदितो आहे ।
तिला न वैरें भिन्न भाव परि
भार सारखा वाहे २४
असें पहातां प्रत्यक्षानें
स्वानुभवासी येतें
ह्मणोनि मी हा बालमतीनें
गाइन त्वच्चरितातें २५
साह्य परी तूं व्हावें मजला
वायु जसा अनलाशी
किंवा आकर्षणशक्ती दे
जडा क्षितीला जैशी ॥ २७ ।

पुढें चालू.

---

मुक्काम पिंपळगांव राजा तारीख २३ माहे जानेवारी सन १८७९ इ०

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांस—

पिंपळगांव राजा येथून विनंती विशेष ह्या गावांत सरकारी आफिसांपैकीं शाळेशिवाय महत्वाचे एकही कांहीं नसल्यामुळे ह्या प्रांतातील वर्तमान पत्रांतून ह्या गाव विषयीं चर्चा कधींच ऐकण्यांत आली नाहीं. येथें पूर्वी पोलिस स्टेशन असून शाळेची जागाही ७५ रुपये पगाराची होती. पण मध्यंतरी पोलिस स्टेशन येथून काढून चाराखडीस नेऊन एथे फक्त औटपोस्ट ठेविलें आहे. हा गांव सुमार अकराशें घराचे वस्तीचा असून त्यांपैकीं निमे मुसलमानांची वस्ती आहे. सर्व वस्तीपैकीं बहुत करून तीन चतुर्थांश लोक उत्पन्न भोजनी आहेत. व्यापाराची तर अगदींच गैरसोय आहे. शाळा मिडल क्लास पैकीं असून सहाव्या इयत्तेपर्यंत अभ्यास होतो, हा या गांवास मोठाच लाभ समजण्याचा आहे. एथें असलेले स्कूल कमिटीच्या मेंबर लोकांनीं एक दोन वर्षां पूर्वीं शाळेस चांगली मदत केल्यावरून मे० डेपुटी कामिशनानीं मे० कमिशनर साहेब यांस शिफारस करून त्या लोकांस दाखले देवविल्यामुळें त्यांस अधिक उमेद येऊन ते विद्यावृद्धीचे कामां चांगले लक्ष देत आहेत व पुढेंही देतील अशी आशा आहे. त्या मेंबर लोकांनीं एक दोन दिवसांपूर्वीं एथील शाळेंत येऊन मुलांची परिक्षा घेतली आणि इतर गावीं विद्यावृद्धीचे उत्तेजनार्थ ज्या तजविजी होतात त्याप्रमाणें एथें कांहीं करण्याविषयीं हेडमास्तर यानीं त्यास सुचविल्यावरून वर्गणीनें रुपये ७१ जमवून त्यांची उपयुक्त कामाकडेस व्यवस्था करावी असें सांगितल्याचें समजल्यावरून शाळेच्या कामांत त्यांचें लक्ष चांगलें आहे असें दिसतें. व ही गोष्ट त्यांस फार भूषणाई आहे.

तारीख १९ मिनहु रोजीं मेहेरबान तहशिलदार साहेब यांची स्वारी कजबे मजकुरीं दवाखान्याकरितां वर्गणी जमविण्याचे उद्देशानें आली होती त्याप्रमाणें एथें तीनशे रुपयांचे आंकडे पडले आणि बाकी सुमोर ७०० सातशें रुपये परगण्यांतून वसूल करणार ह्मणून समजतें तरी सदरील रुपये वसूल होऊन दवाखाना लवकरच स्थापन झाल्यास ह्या गांवांतील सर्व लोकांचें मोठें कल्याण होईल असें वाटतें.

आपला एक

" क्ष ,,

---

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

वि० वि० निजाम सरकारच्या राज्यरीतीची व्यवस्था.—मी थोडे दिवसापूर्वी कांहीं खानगी कामाकरितां मोंगलाईत सेवर्गें, कळमनुरी वगैरे गावीं गेलो होतों. त्या ठिकाणीं जी व्यवस्था पाहिली व राज्यकारभारसंबंधाची कशी व्यवस्था आहे याविषयींची जितकी माहिती मिळूं शकेल तितकी माहिती मिळवून आपल्या येत्या अंकी वाचकांचे माहितीसाठीं खालीं चार ओळी लिहिल्या आहेत.

निजाम सरकारच्या राज्याचे एकंदर पंधरा विभाग केलेले आहेत त्यास जिल्हे ह्मणतात. प्रत्येक जिल्ह्यावर एक एक अमलदार असतो त्यास अवल तालुकदार ह्मणतात. या अंमलदारास अधिकार बहुतकरून जिल्हामाजिस्ट्रेट व कलेक्टरप्रमाणेंच असतो. व तीन अगर चार जिल्ह्यावर एक सदरतालुकदार असतो. अवलतालुकदारास मदत करण्याकरितां दुय्यम व शियम तालुकदार असतात त्यांची संख्या ज्याप्रमाणें जिल्हा लहान मोठा असतो त्याप्रमाणें असते. सदर तालुकदाराचे दोन दरजे आहेत. एकास १२०० रुपये व एकास १००० रुपये पगार. अवलतालुकदाराचे चार दरजे आहेत. ६००, ७००, ८००, व १०००. दुय्यम तालुकदारास ३५० रुपये आणि शियमास १५० याप्रमाणें जिल्ह्याचे अमलदारांच्या व्यवस्था आहेत. खालसा जिल्ह्याप्रमाणें इकडे मुनसफाच्या नेमणुका केलेल्या नाहींत. सर्व दिवाणी काम वर लिहिलेले अमलदारच पाहूं सकतात व कनिष्ठ मुनसफ कोर्टाचे काम कांहीं अंशीं तहशिलदार करितात. तहशिलदारास दिवाणी कामाचे बाबदींत ५० रुपयांपासून १०० पर्यंत मुकदमे घेण्याचा अधिकार आहे. तहशिलदाराचेही चार वर्ग आहेत पगार ८०।१००।१२५ १५० रुपये. बाकी तहशिलीच्या इस्टाब्लिशमेंटची व्यवस्था बहुतेक अंशीं इंग्रजी राज्याप्रमाणें आहे. या बाबदींत पुष्कळ माहिती देण्यासारखी आहे ती सवडी सवडीनें लिहू.

हल्लीं इकडे महर्गता दिवसेंदिवस फारच होत चालली आहे. जवारी १२ शेर, गहू ७ शेर, हरभरे ७ शेर, तांदूळ ८ शेर, तेल ६ रुपये मण याप्रमाणें भाव आहे

इकडे शाळाखात्यांतील व इतर खात्यांतील नोकर लोकांस पूर्वी प्रमाणें आपल्या पगारांत गुजारा होण्याचा संभव दिसत नाहीं कारण महागाई फार आहे आणि पैसा पूर्वीं जो मिळत होता तोच आहे. तरी या विषयीं आमचें दयाळू सरकार लक्ष पुरवील अशी आशा आहे. कळावें ता० १९ जानेवारी सन १८७९ इ.

मुळावें जिल्हा वाशीम

आपला मित्र.

---

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

वि. वि. पुढील मजकूर आपल्या पत्रीं छापण्याची मेहेरबानी व्हावी.

रा. रा. मुकुटराव देशमुख रहाणार उगवें तालुके अकोलें हे कांहीं खानगी कामाकरितां काल रोजीं अकोटास आले होते ते तेथील इं. म. शाळा पहाण्याकरितां प्रातःकाळी गेले होते. तेथील शाळेची व्यवस्था पाहुन त्यांस समाधान वाटलें व मुलांस झटुन विद्याभ्यास करण्या विषयीं उत्तेजन यावें यानकरितां कांहीं पुस्तकें व मिठाई बक्षीस देण्या विषयीं आपली इच्छा दर्शविल्या वरून संध्याकाळीं चार वाजतां तत्प्रीत्यर्थ समारंभ झाला. सरकारी नोकर, स्कूल कमिटीचे मेंबर व गांवांतील कित्येक संभावित गृहस्थ यांस पाचारण केलें होतें. मेहेरबान दोराबजी साहेब तहशिलदार हे अध्यक्ष स्थानीं होते. मंडळी जमल्यावर तहशिलदार साहेब यांनीं समारंभाचा उद्देश सर्वांस कळवून मुकुटराव यांच्या स्तुत्य कृत्याबद्दल संतोष दर्शविला नंतर शाळेंतील कित्येक मुलांनीं कांहीं कविता ह्मटल्यावर, हेड मास्तर रा. रा. सदाशिव गोविंद दामले यांणीं मुकुटराव यांच्या औदार्यास अनुलक्षून थोडें भाषण केलें. नंतर मुलांस पुस्तकें व मिठायी आणि मंडळीस हार तुरे अत्तर गुलाब विडे वगैरे वाटिलें आणि सभा विसर्जन झाली.

मुकुटराव हे वयानें तरूण असून त्यांची वर्तणूक पोक्त मनुष्याप्रमाणें आहे. विद्यावृद्धीकडे यांचें लक्ष असून त्या कामीं हे फार झटतात ही गोष्ट त्यांस मोठी भूषणास्पद आहे.

आपल्या गांवाचा अभिमान सर्वत्रांसच असतो, व तेथील गोष्टी चांगल्या असाव्यां असें त्यांस वाटतें. व त्याविषयीं ते थोडा बहुत यत्नही करितात. परंतु इतर ठिकाणच्या गोष्टींसें उत्तेजन देण्याची उदाहरणें फारच विरळा आढळतील. सध्या तर शाळाखात्यांत दोनच दृष्टोत्पत्तीस येत आहेत. एक मुकुटराव हे उगव्याचे रहाणारे असून त्याणीं अकोट एथील शाळेंतील मुलांस बक्षिसें दिलीं हें व दुसरें रा. रा. गबूसिंग यशवंतराव जमादार अकोट स्कूल कमिटीचे अध्यक्ष, व रा. रा. शिवचंद चुनीलाल अकोट एथील सावकार, यांणीं अकोलें एथील इ० म० शाळेंतील मुलांस बक्षिसें दिलीं हें. या शिवाय दुसरीं उदाहरणें कोठें घडल्याचें ऐकिवांत नाहीं. तारीख ३० माहे जानेवारी सन १८७९ इसवी.

अ०

## जाहिरात.

### पातुरची नानासाहेबांची यात्रा.

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं कसबे पातुर शेखबाबू एथें नाना साहेबाची यात्रा ज्या जागावर भरते ती जागा माझे मालकीची आहे त्या जागेवर बसणारे लोकांपासून भाडें घेणें अगर न घेणें ही खुशीची गोष्ट आहे अशाबद्दल हुकुमही मिळाला आहे. त्याप्रमाणें पुष्कळ लोक भाडें देतात व कांहीं लोक विनाकारण भाडें देण्यास तक्रार करितात याजकरितां या जाहिरनाम्यानें कळविण्यांत येते कीं ज्या लोकांस आमचे मालकीचे जागेवर दुकान करण्याची गरज असेल त्यांनीं आह्मास भाडें देऊन नंतर दुकान लावावें भाडें दिल्याखेरीज दुकान लावूं नये. लावल्यास भाडें न दिल्याबद्दल दिवाणी मार्गानें निकाल केला जाईल.

भाड्याचे दर —

२ रुपये प्रत पहिली.

१ रुपया प्रत दुसरी.

॥ आठ आणे प्रत तिसरी

। चार आणे प्रत चवथी.

येणेंप्रमाणें दरवारी लिहिली आहे या खेरीज कमी ज्यास्त करून घेणें असल्यास समक्ष भेटावें. तारीख २९ माहे जानेवारी सन १८७९ इसवी.

( सही )

देवीदास विठोबा

दस्तुर खुद्द

---

## नोटिसा.

---

रा. कृष्णा वल्लद शामा माळी रहाणार जयपुर तालुके मलकापुर यास वऱ्हाडसमाचार छापखान्यांतून नोटिस देण्यांत येतें कीं तुह्मी सन १८७६ चे मार्च महिन्यांत वऱ्हाडसमाचारांतून एक नोटिस छापविली तिला तीन वर्षें होण्यास थोडे दिवस शिलक राहिले आहेत. अजून पैसा आला नाहीं. सबब तुह्मावर नोटिस देणें जरूर झालें आहे. ही नोटिस पोचल्यापासून ४ दिवसांत मागील नोटिसीचा खर्च ७॥१२ व या नोटिसीचा खर्च २ रु. मिळून ९॥१२ न पाठविल्यास तुह्मावर दिवाणी कोर्टांत दावा लावून खर्चा सुध्दां रकम घेतली जाईल. कळावें तारीख १ माहे फब्रुवारी सन १८७९ इसवी.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

---

नोटिस.

विठोबा वल्लद पुंजाजी माळी जुमडे वस्ती पिंपळखेडें तालुके चिखली यासी राघो वल्लद दावल माळी इंगळे रहाणार मौजे गवढाळ तालुके खामगाव याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, आमची पुतणी नामे गंगा हिचें तुह्मासी लग्न झालेलें आहे. असें असतां तुह्मी तिला वागवित नाहीं. आज ७ वर्षें झालीं. तिचा बाप जानजी तायडे मयत झाला आहे. व तिला अन्न वस्त्र आह्मी देत असतो. तुह्माजवळ राहून तिला कांहीं फळही नाहीं. कारण तुह्मी माणसांत नाहीं, याजकरितां ही नोटिस पोंचतांच लग्नाची फारखत पाठवून द्यावी. व अन्न वस्त्राचा खर्च सालीना ५० रुपये प्रमाणें ३५० रुपये पाठवून द्यावा. तुह्मी मनुष्यांत आहो अशी खात्री करून दिल्यास अजूनही मुलगी तुह्माकडे पाठविण्यास आह्मी सिद्ध आहो पण तसें न होईल तर मुलीचें वय १८ वर्षांचें झालें आहे सबब तिला दुसरा गंधर्वाचा नवीन घरठाव करून देणें जरूर आहे व त्यासाठीं तुह्मांस अगाऊ कळविलें आहे नोटिस पावल्यापासून १५ दिवसांत तुह्मी कांहीं तजवीज केली नाहीं व सोडचिठी पाठविली नाहीं तर तुमचा उजूर न धरतां तुह्मांस आमची शर्त मान्य आहे असें समजून मुलीचा दुसरा घरठाव करू व तुह्मावर अन्न वस्त्राचे खर्चाबद्दल फिर्याद करू हें पक्कें समजावें. कळावें तारीख १ फेब्रुवारी सन १८७९ इ.

( सही ) राघो वल्लद दावल माळी.

---

वऱ्हाडसमाचार

मिति माघ शुध्द १० शके १८००

## मुंबईचा साहूसावकारा.

पश्चिम हिंदुस्थानांत मुंबई शहर धन कनक संपन्न अशी बहुत दिवसांपासून विख्याति आहे. व कलकत्ता मद्रास पाहून आलेलेही कित्येक लोक सांगतात कीं तिन्ही इलाख्यात मुंबईचें वैभव पुष्कळ गोष्टींनीं श्रेष्ट आहे. पण तेथें आतां कली पुरुष किंवा शकुनी मामा उत्पन्न होऊन लागले आहेत त्यावरून वाईट वाटतें थोड्या वर्षांमागें अमेरिकेंतल्या लढाईच्या वेळीं हिंदुस्थानांतील कापसास तेजी आली तेव्हां मुंबईस व देशांत पैसाच पैसा झाला. व शेर मार्केट आणि ब्यांकी अनेक झाल्या व मुंबईची मोठी भरभराट दिसून आली. तशा प्रसंगीं प्रेमचंद रायचंद हे पुरुष निर्माण झाले व त्यांनीं शेकडो साहू लोकांच्या तोंडाला पानें पुसलीं आणि मुंबईच्या सावकाऱ्याचें मातेरें केलें. त्यांतून तिला डोकें वर करण्यास बराच काळ लागला. व व्यापाराची व पैशाच्या घडामोडींची चळवळ पुन्हः सुरू झाली. कित्येक जुने साहू मागें पडून नवीन उदयास आले. याच प्रसंगांत केशवजीनाईक भाटे पुढें सरसावले. हे सामान्य धंदा करीत असतां असतां पुढें सरसावले तों यांची पुंजी ८० लक्षांची झाली. व त्यांचा मोठा बोलबाला झाला. नंतर विलायती वस्त्रें तयार करण्याच्या गिरण्याचे कारखानें चालू झाले. मुंबईस पांच पंचवीस गिरण्या झाल्या. कोट्यावधि रुपयांचें भांडवल त्यांत खेळूं लागले इतक्यांत केशवजनिाइक व्यवहार आटपून देवदेवार्चनास लागले व त्यांचे चिरंजीव नरसी केशवजी नावारूपास आले ते चार गिरण्यांचे म्यानेजर झाले एक गिरणी यांनीं आपले नावानें केली. व सगळ्या मुंबईत हे मोठ्या प्रतिष्ठेनें मिरवूं लागले. व मुंबईच्या व्यापारास पुन्हा मोठी तेजी आल्या सारखें यांनीं केलें पण तो सर्व बाह्य रंग होता. अंतर्यामीं कपट करून हजारो लोकांचें भांडवल यांनीं आपले घरांत घांतलें व शेवटीं दिवाळें काढून तोंड काळें करून मुंबईतून पळून गेले! यामुळें प्रस्तुत मुंबईत मोठा कल्लोळ उसळला आहे. गिरण्या बंद पडत आहेत. नवी नवी दिवाळीं निघत आहेत. मोठमोठाल्या नामांकित सावकारावर फौजदारी खटले उभे होत आहेत. कामा घराण्या सारखे लोक व केशवजीनाइकासारखे बारंटानें धरले जात आहेत व लाख लाख पन्नास पन्नास हजार रुपयांच्या जामिनावर ते सुटत आहेत. अशी हाल अपेष्टा मुंबईचे साहू लोकांची होऊन गेली आहे व व्यापाराला मोठा धक्का बसला आहे.

मुंबईचे लोक विश्वासू व भोळसट असे आख्या आहे ती खरी होय व त्यामुळेंच त्यांचें असें वाटोळें करण्यास दुष्ट पुरुष उत्पन्न होतात ही दुर्दैवाची गोष्ट आहे! गिरण्याचा कारखाना हिंदुस्थानांत बाढून विलायती कापड इकडे येण्याचें बंद होईल व तेणेंकरून देशात शाश्वत संपत्ती राहील अशा भरावर सारा हिंदुस्थान देश असतां या नरसोबानें आपल्या भयंकर व राक्षसी कृयानें त्यास मोठा गोता दिला. हजारो लोकांचीं आंतडीं बाहेर काढिलीं. शेकडो लोकांच्या डोळ्यांत दिवसाढवळ्या माती घातली. कोट सवा कोट रुपयाला भोळ्या लोकांना बुडविलें आणि आपण नादार झाले, जिनगीची यादी दिली तींत २ आंगखे' ४ बंड्या, एक पागोटें, पांच सात स्वयपाकाचीं भांडीं वगैरे माल लिहून दिला. वा:! धन्य त्या नरसीची ! व याचे अब्रूची! अब्रू गमावून मिळालेल्या पैशाला काय जाळावयाचें आहे? हजारो लोकांचा शाप त्याला सुखानें भाकरी खाऊ देणार नाहीं. आतांच ह्मणतात कीं, नरसी हा मिशा काढून भगवें नेसून परमुलखांत दमण एथें छपून बसला आहे. अरेरे ! काय हाल अपेष्टा ही ? असे दुष्ट लोक लवकर नष्ट होवोत आणि चांगल्याची भरभराट असो असें परमेश्वराजवळ आह्मी मागणें मागतो.

---

## विलायतेंतील विशेष गोष्टी.

बहुत प्रसंगीं आह्मी विलायतेंतील उत्तम गोष्टी कळवून हिंदुस्थानच्या लोकांस हिणावलें आहे. तो त्यांचा थोरपणा वास्तवीक आहे, पण त्याच्या उलट गोष्टींतही विलायत मागें आहे असें नाहीं. वाईटपणाचा कांहीं गोष्टींत तिकडे कळस आहे. व त्या ऐकिल्या ह्मणजे आमच्या हिंदुस्थानची अडाणी स्थिति बरी असें वाटतें.

लेडी गून ह्मणून कोणी श्रीमान स्त्री आहे तिचा पुत्र मरण पावला ह्मणून नव-

त्याची तिजवर इतरांनी झालेली दूर करण्याकरितां तिनें गरव्हारपणाचें व बाळंतपणाचें सोंग करून एक मूल कोणाचें १९ दिवसांचे वयाचें मिळविलें. ती गोष्ट फुटून पुष्कळ चर्चा झाली आहे व फौजदारी कोर्टापर्यंत मजल गेली आहे.

वऱ्हाडांत नवऱ्याबायकोच्या नोटिसी पुष्कळ होतात ह्मणून आरडा आहे पण विलायतेंत हा प्रकार कमी नाहीं. घटस्फोटाचे मुकदमे विलायतेंत प्रतिवर्षी पुष्कळ होतात तिगस्त सालीं ५८६ झाले होते व व गुदस्त सालीं ६६६ झाले. एकेक मुकदमा इतका विलक्षण असतो कीं त्यांत शहाणपणाच्या नीचतेचा कळस दिसून येतो. विलायतेंत या फिर्यादी करण्याची अशी चाल आहे कीं नवरा आपले बायकोवर व उगारावर तिचा लग्नाचा हक्क रद्द करण्याविषयीं फिर्याद करितो. व त्यांत स्त्रीच्या व्यभिच्याराचा तिच्या चिठ्ठ्याचपाठ्यांनीं व इतर खुलाशानें पुरावा होत असतो, नंतर उगारावर नवऱ्याचा खर्च घालतात व बायकोचा वे दावा करून देतात.

या आठवड्यांत आह्मी एक चमत्कारीक गोष्ट वाचली कीं एकाची बायको व्यभिचारणी झाल्यावरून त्यानें मोठे दुःखानें तिचा लग्नाचा हक्क रद्द करविला. व त्याचे मनास यामुळें मोठा धक्का बसला आहे असें सर्वांस दिसून आलें. पुढें कांहीं दिवसांनीं या स्त्रीनें दुसरे एका पुरुषाबरोबर लग्न करण्याचा निश्चय केला व उद्या लग्न होणार तों पूर्व दिवशीं रात्रीं तिला एक पेटी आली ती उघडून पहाते तों तिच्या पूर्व पतीनें एक पत्र व जडावाचे कांहीं मोलवान दागिने तिला बक्षीस पाठविलेले होते. व पत्रांत लिहिलें होतें कीं तूं द्वितीय विवाह करणार हें ऐकून फार संतोष झाला. व माझी इच्छा आहे कीं नवीन पतीपासून तुला सर्व प्रकारचें सुख मिळावें व तुह्मी दोघांनीं आनंदानें कालक्रमणा करावी.

विलायतेंत मुख्य राजधानी शहर लंडन एथें रस्ते सफाईचा बंदोबस्त गेल्या महिन्यांत १० दिवस इतका वाईट होता कीं, प्रसिद्ध रस्त्यावरून बर्फ पडलेलें कांहीं काळ निघत नव्हतें व तेणें करून गाड्या घोडी व इतर प्राणी यांस जाण्यायेण्यास प्रतिबंध होत असे. साऱ्या पृथ्वींत सुधारणेचे कळसास पोचलेलें जें शहर त्यांत अधिकाऱ्यांची इतकी अनास्था तेव्हां याहून लज्जास्पद दुसरें काय आहे? असें एका तिकडील वर्तमान पत्रांत लिहून आलें आहे.

सारांश कोठें कांहीं गोष्टी चांगल्या याहून तेथील सर्वच चांगले असे कोणी समजूं नये-"गाव आहे तेथें हेंदर आहेच आहे" ही ह्मण खोटी नाहीं.

---

लढाई विषयीं या आठवड्यांत कांहीं विशेष खबर नाहीं. अमीराचा भाऊ सरदार वली महमद इंग्लिश सरकारास शरण आला. तसाच अय्यद कुनर एक पराक्रमी सरदार इंग्लिशांशी धर्मयुद्ध चालवील असा अमीरास मोठा भरवसा होता. तोही इंग्लिश सेनापतीस येऊन मिळाला. गिलजाई लोकांनेही कित्येक सरदार अमीराचे भावाबरोबर इंग्लिशाकडे आले. याकुबखान काबूल एथें स्वस्थ बसला आहे. त्याच्या स्वस्थ बसण्याचीं कारणें दोन बोलतात. एक तो बहुत दिवस कैदेंत होता ह्मणून रोड झाला आहे. आणि दुसरें, जेव्हां त्याच्या बापानें रूस देशांत जातांना त्याला कैदेंतून सोडवून राज्यकारभार सांगितला. तेव्हां त्यानें याकुबखानापासून शपथपूर्वक करार करून घेतला कीं, मी तुमच्या हुकुमाशिवाय कांहीं करणार नाहीं. तो करार याकुबखान जपून पाळित आहे असें ह्मणतात. कसेंही असो. तो स्वस्थ आहे. तसेंच रशियाचा बादशहा अमीरास आपले राजधानीस आणून समारंभानें भेटण्यास खुशी नाहीं. व अमीर रशिया देशांत अजून गेला नाहीं असेंही वर्तमान आहे.

---

**सहा हजारांची तार**—लढाया सुरू झाल्या किंवा कांहीं महत्वाचीं प्रकरणें कोठें चालू झालीं ह्मणजे श्रीमान वर्तमानपत्रकर्ते त्या त्या स्थळीं आपले बातमीदार पाठवून तारायंत्रांतून बातम्या आणवून आपले वर्तमानपत्रांत प्रसिद्ध करितात. तेणेंकरून त्यांच्या पत्राचा मोठेपणा अधिक होऊन खपही अधिक होतो. काबुलच्या लढाईच्या ठिकाणीं हिंदुस्थानांतून व विलायतेहूनही वर्तमानपत्रांचे बातमीदार गेले होते. व ते तारायंत्रांतून बातम्या पाठवित असत. त्यांत विलायतेंतील स्टांडर्ड पत्राची एक गोष्ट ऐकिली कीं, एके दिवशीं एका बातमीला त्यांनीं ६००० रुपये तारायंत्राचें हाशील भरलें. वर्तमानपत्रांच्या तारबातम्यांस इतर बातम्यांचें चौथाई हाशील लागत असतें. हे आमचे वाचकांस ठाऊक असेलच. ह्मणजे एके दिवशीं त्यांनीं साधारण दराप्रमाणें २४००० रुपयांचे शब्द तारेंतून पाठविले. धन्य त्या पत्रकर्त्यांची! लाखो रुपये पाहिजे त्या धंद्यांत घालणारे भले! व त्यांचें नशीब त्यांस यश देणारें भलें!

---

## दुष्काळ कमिशन.

प्रस्तुत कमिशनाचे सभासद उत्तर हिंदुस्थानांतील कांहीं ठिकाणें पाहून हल्लीं मद्रास इलाख्यांत आले आहेत हें आमच्या वाचकांस विदित असेलच, हे गृहस्थ मद्रास एथें आल्यावर त्यांनीं तेथील प्रसिद्ध डा. कार्निश व आणखी कांहीं इतर गृहस्थ यांच्या साक्षी घेतल्या. या साक्षींत सदर्हू गृहस्थांनीं काय मजकूर सांगितला याजबद्दलची हकीकत अद्यापि कांहीं कळली नाहीं. तथापि हा दुष्काळ उद्भवल्यापासून डा. कार्निश यांचें वर्तन सर्व प्रसिद्ध आहे त्यावरून त्यांनीं कोणत्या प्रकारची साक्ष दिली असेल यांचें अनुमान सहज होण्यासारखें आहे. हें कमिशन सरकारांतून नेमण्यांत आलें त्या वेळचे सरकारचे उद्देश निदान दर्शनी तरी स्तुत्य होते यांत संशय नाहीं व त्या उद्देशाचे यथावत् परिसीलन जर सदर्हु कमिशनाकडून होईल ह्मणजे हें कमिशन जर आपलें कर्तव्य योग्य रीतीनें बजावील तरच त्यापासून या नष्टभाग्य देशाचें कल्याण होईल. एरवीं नाहीं हें उघडच आहे. कमिशनाचें आजपर्यंत ज्या प्रकारचें वर्तन झालें आहे तोच प्रकार जर कमिशन असाच पुढे चालवील तर हें कमिशन लवकर आटपलेलें बरें असें ह्मणणें आह्मांस भाग पडतें. कारण या दुष्काळाचें वास्तवीक स्वरूप समजावयास झटलें ह्मणजे कमिशनास दुष्काळानें अत्यंत त्रस्त झालेल्या प्रदेशांतील बऱ्याच भागांत फिरून प्रत्येक ठिकाणीं पूर्णपणें चौकशी करणें अवश्य आहे ही चौकशी, नुसती आगगाडींतून एके दिवसांत शंभर शंभर दोन दोन शें कोस प्रवास करून मोठमोठ्या शहरांत प्रवासी लोकांच्या सोयी करितां बांधिलेल्या भव्य बंगल्यांत राहून होणें दुरापास्त आहे. तर दररोज थोड्याथोड्या अंतरावर प्रवास करून व अनेक अनुभव प्रत्यक्ष पाहून तेथील स्थितीचें यथावत अनुमान केल्यानें होणार आहे. प्रस्तुतचें कमिशन हल्लीं ज्याप्रमाणें नुसतें सुपीक प्रदेशच पहात फिरत आहे त्याप्रमाणेंच तें फिरत राहिल्यास हा सर्व खटाटोप, व्यर्थ जाणार आहे. तसेंच हल्लीं मद्रास प्रांतांत हें कमिशन आगगाडींतून फिरत असून तेंही रात्रींच बहुधा फिरतें. यावरून या कमिशनास आगगाडीचे वेगांतही दिवसाउजेडीं ज्या कांहीं गोष्टी दृष्टोत्पत्तीस येण्याचा संभव होता, तो यायोगें मुळींच नाहींसा होत आहे, ही फार दुःखाची गोष्ट आहे; व हा कमिशनाचा गतिक्रम ज्यांनीं ठरविला असेल त्यांस तर अत्यंत लज्जास्पद आहे! या कामीं मद्रास सरकारानें अवश्य लक्ष पुरवावें अशी आमची त्यांस सूचना आहे.

तसेंच हें कमिशन येत्या महिन्यांत मुंबई इलाख्यांत फिरत फिरत येणार आहे. तेव्हांही हा प्रकार न व्हावा एतद्विषयीं सरकारांनीं खबरदारी घ्यावी अशी आमची त्यांस सविनय सूचना आहे. कारण कीं दुष्काळत्रस्त लोकांची सरकारांतून आजपर्यंत हेळसांडच होत गेली, व आतां कमिशनाच्या द्वारें सर्व खरी हकीकत बाहेर पडून लोकस्थिति सुधारण्याची ही शेवटली संधि आहे या करितां तीही जर सरकारांनीं दवडिली तर या अनन्यशरण अनाथ, हतभाग्य लोकांची निःसीम दुरवस्था होईल यांत संशय नाहीं. याजकरितां आजपर्यंत केलेल्या वर्तनास विसरून ह्या प्रसंगीं तरी सरकारांनीं आपल्या कर्तव्यास जागावें असें आह्मांस वाटतें. इं. प्र.

## वऱ्हाड.

मि० हेर साहेब असिस्टंट कमिशनर यांस फेब्रुवारीचे पहिले तारखेपासून तीन महिन्यांची हक्काची रजा मिळाली.

---

रा. रा. पुरुषोत्तमराव नारायण भट मलकापुरचे एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर यांस बुलढाण्यास नेमिलें. व बुलढाण्याचे मि० थामसन साहेब असिस्टंट कमिशनर यांस मलकापुरास आणिलें.

---

आह्मांस लिहिण्यास दुःख वाटतें कीं, रा. रा. माधवराव गोपाळ गोखले उमरावतीच्या स्माल काज कोर्टाचे क्लार्क आजारी पडून पुण्यास गेले होते तिकडे ते मरण पावले. हे अल्प वयी असून कामांत उत्तम हुशार व मोठे सुस्वभावाचे होते त्यांचें मरणाचें सर्वत्र त्यांस जाणणाऱ्या कोणाही मनुष्यास दुःख झाल्यावाचून रहाणार नाहीं.

त्यांचे जागेवर अकटिंग काम करीत असलेले राव बहादूर डायरेक्टर यांचे चिरंजीव रा. रा. विश्वनाथ नारायण हे आतां मुक्रर होतील असें वाटतें. हेही हुशार आहेत.

---

हैदराबादेकडे रब्बीचीं पिकें फार चांगलीं आलीं आहेत असें तिकडील पत्रावरून समजतें.

---

एथें येवलेकर व अमळनेरकर हरदास आले आहेत. त्यांच्या कथा मंडळीस बऱ्याच होत आहेत. यांची भाषण शैली व कीर्तनाची ढब चांगली आहे.

---

थंडीचें मान बदललें आहे. व थोडा थोडा ऊष्मा होण्यास सुरवात झाली आहे गांवांत सीतज्वराची तुरळक सांथ आहे.

---

उर्दू अखबारांत लिहिलें आहे कीं, वऱ्हाड प्रांताचा रेसिडेंट साहेबाकडील संबंध काढून मुंबई इलाख्याकडे लावण्याचें वर्तमान आहे.

---

वकील लोकांची दिवाणी मुकदम्यांतील फी कमी करण्याची वार्ता असल्याचें उर्दू अखबारांत लिहिलें आहे.

---

मे० दस्तुर बहिमनजी साहेब कंप्यानियन यांस अकोल्यासच कायमचे स्माल काज जडज करण्याचा बेत आहे. उ. अ.

---

मूर्तिजापुर एथील शाळेंत विद्यार्थ्यांची संख्या ज्यास्त वाढल्यामुळें तेथील स्कूलकमिटीचे मेंबर्स रा. रा. विश्वनाथ आत्माराम भडंग व मि० जोरावरसिंग खुशालसिंग यांणीं आपले स्वतःचे खर्चानें, दरमहा सहा रुपये पगाराचा सहा महिने एक अ. मास्तर नेमण्याची इच्छा मे० डायरेक्टर सा. यांना कळविल्यावरून त्यांनीं सदर्हू गृहस्थांची आभारपूर्वक देणगी मान्य करून अ. मास्तरची नेमणूक केली व त्या सत्कृत्याबद्दल मे० कमिशनर साहेब यांना सदर्हू गृहस्थांचीं नावें कळविलीं. त्यावरून वरील उभयतां गृहस्थांस, मे० कमिशनर साहेबांणीं सर्टिफिकिटें दिलीं आहेत असें कळतें. हें उदाहरण इतर स्कूल कमिटीचे गृहस्थांनीं घेण्यासारखें आहे. प्र. सिं.

## वर्तमानसार.

श्रीमंत शिंदे सरकार यांची स्वारी कलकत्त्यास गेली आहे त्यांची मुलाकात व्हाइसराय यांणीं ता. ११ शनिवार रोजीं दरबार भरून केली.

कलकत्ता येथील युनिवर्सिटीच्या म्याट्रिक्युलेशन परीक्षेस २९९१ व बी ए च्या पहिल्या परीक्षेस ९२४ उमेदवार गेले होते त्यांजपैकीं अनुक्रमें १२०० व २६४ पास झाले असें समजतें.

मद्रास इलाख्यांत चल्लारी पासून मर्म गोंव्या पर्यंत दोनशें मैल रेलवे लवकरच सुरू करण्याविषयीं विलायतेहून स्टेट सेक्रटरीकडून लिहून आलें आहे.

ग्वालिएरचे शिंदे सरकार आजारी होते त्यांची प्रकृति दुरुस्त होऊन ते व्हाईसराय साहेबांचे भेटीस कलकत्यास गेले.

युरोप खंडांत लेगहार्न एथें राजे लोकांस ठार मारण्याचे बेतबात करीत जाणेयान करितां एक मंडळी झालेली आहे. व तिनें आपलें नाव "नोबिलिंग क्लब" असें ठेविलें आहे.

बेस्टन येथील शाळांत बुकांचा मुळींच उपयोग करीत नाहींत. खालच्या वर्गांतून तर तोंडींच शिकवितात व वरच्या वर्गांतून बुकांच्या ऐवजीं वर्तमानपत्रांचा उपयोग करितात असें समजतें.

बंगाल्यांतील श्रीमती कादंबिनी दासी गांगाथी बाई म्याट्रिक्युलेशनच्या परिक्षेत पास झाली, हें पहिलेंच उदाहरण आहे या बाईचें वय सतरा वर्षांचें असुन हिचें अद्याप लग्न झालें नाहीं असें ह्मणतात.

येत्या जून महिन्याच्या सतरावे तारिखेस विलायतेस सिविल सर्विसची परिक्षा व्हावयाची आहे. या परिक्षेच्या नव्या नियमाप्रमाणें ह्मटलें ह्मणजे तारिख १ली जून १८७९ रोजीं उमेदवारांचें वय १९ वर्षांच्या आंत पाहिजे. या नियमाप्रमाणें झटलें ह्मणजे नेटिवांस ही परीक्षा देतां येणें कठीण. परंतु लिहिण्यास आनंद होतो कीं फुनेंद्र भूषणी चातरजी हे या परिक्षेस बसावयाचे आहेत. ने. ओ.

मुंबईच्या ग्याडम कंपनीच्या दोघां साहेबांनीं ख्याच्या मुरारजी मुळजी नांवाच्या भाड्या मुकदमास कोठडींत कोंडुन सुमारें १,९१,००० रु. च्या रकमेची सोडचिठी बळजुरीनें लिहून घेतली होती परंतु मुकदमानें पोलिसांत मागाहुन फिर्याद केली होती त्या रुजेनें साहेबांनीं तीसहजार रु० देऊन घांत समजूत केली असें कळतें

धर्म व सरकार.—पा. ग्या. वरून कळतें कीं, रशियामध्यें कांहीं पाद्री लोकांनीं उपदेश करून गांवच्या लोकांकडुन मद्यपान सोडविलें. याजबद्दल तेथील सरकारी अधिकाऱ्यांनीं वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सरकारी उत्पन्न कमी होण्याच्या संबंधानें कळविलें. त्यांनीं त्या पाद्री लोकांस दुसरीकडे घालवून दिलें. हाच प्रकार इतर सरकारांमध्यें दिसून येतो.

ता. २३ रोजीं दमण स्टेशनवर शेट नरसी केशवजी वेष बदललेले आगगाडींत बसले व पुढें वसईस उतरले असें बा. ग्या. त छापिलें आहे.

वर्तमानपत्रें पुस्तकें वगैरे छापण्यांत येतात त्यांजवर देखरेखीकारितां रशिया सरकारचा सालीना सुमारें अडीच लक्षांचा खर्च आहे.

नवीन स्टांप आक्टास हिं. स. ची मंजुरी मिळाली असून तो येत्या एप्रिल महिन्याच्या १ ल्या तारखेपासून अंमलांत येणार.

मद्रास येथें घोड्यांना चमत्कारिक रोग उत्पन्न झाला आहे. त्या मुळें त्यांनां भयंकर पडसे येते व खोकला उत्पन्न होतो तेथील तोफखान्याचे सर्व घोडे आजारी पडले आहेत. हा रोग तेथें रात्रीं फार यांडी पडते यामुळें उत्पन्न झाला असें ह्मणतात

ला वलान्टायर यांचें लंडन येथील एका वर्तमानपत्रांत एक पत्र छापलें आहे त्यांत ते असें सुचवितात कीं, आमचे सरकारानें अफगाणिस्तानांत जो नवीन मुलूख काबीज केला आहे त्याची राजधानी कंदाहार येथें करून सक्काहून पेथपर्यंत आगगाडीचा रस्ता करून ती लैन कराचीपर्यंत आणून मिळवावी, ह्मणजे असें केल्यानें आपली सत्ता तेथें दृढतर होऊन व्यापार वाढेल व सुधारणाही पुष्कळ होईल.

## संगती.

याविषयावर उमरावतीच्या वक्तृत्वोत्तजक सभेत झालेलें एका उमेदवाराचें भाषण.

अभंग

ज्या जशी संगती, त्यासी तशी गती ॥
समागमें रीति सर्व कांहीं ॥ १ ॥
सर्व कांहीं घडे. संगतीच्यामुळें ॥
साधूचीं लक्षणें, साधुसंगें ॥ २ ॥

हा अभंग महान भगवद्भक्त साधु रामदास स्वामी यांचा आहे त्यांची वाणी आपणास परम बोधकारक आहे. आपले वाडवडिलांपासून ती आपण ऐकत आलों आहों. लोकांस उपदेश करण्यास सन्मार्गास लावण्यास आपले देशांत कथा कीर्तन करण्याची पूर्वापार चाल आहे त्यांत कीर्तनाचा मूळ आरंभ रामदास स्वामी किंवा तुकाराम बुवा यांच्या अभंगानेंच करितात. ह्मणून त्यांच्या अभंगाची योग्यता शास्त्रप्रमाणें फार मोठी आहे.

या अभंगांत संगती विषयीं सांगितलें आहे. तें असें कीं, मनुष्याला जशी संगती लागते त्याप्रमाणें त्याचा पुढें परिणाम होतो. चाल, रीति भाती, वागणूक सर्व कांहीं संगतीच्या अनुरोधानें मनुष्यास लागुन रहातात. साधूची संगती असली तर मनुष्य साधू होतो आणि चोर, छिनाल, विसनी यांची संगती लागली तर तो तसा होतो. हें जग चांगल्याकरितां आहे. आणि मनुष्य मात्राचें कर्तव्यकर्म हेंच आहे कीं त्यानें नीतीनें, सदाचारानें, ईश्वर भीतीनें वागवें ह्मणजे त्याची सर्वत्र कीर्ति होऊन जन्मास आल्याचें सार्थक होते.

इतिहास पाहिले असताही चांगल्या संगतीनें मनुष्याचा चांगुलपणा वाढत आहे आणि तो जगांत मोठा कीर्तिमान झाला आहे. रामायणांतील कथा आपणा सर्वांस श्रुत असेल कीं वाल्या नावाचा एक कोळी होता, त्यानें अनंत पातके केलीं, हजारो ब्रह्महत्या केल्या शेवटीं नारद ऋषीची त्याला संगती मिळाली तेव्हां त्यास पश्चात्ताप झाला आणि त्यानें आपले सर्व दुर्गुण टाकिले तेव्हा तो वाल्या कोळ्याचा वाल्मिक ऋषी या नावानें विख्यातीस आला. दुसरा, राक्षस कुळांत जन्म पावले ल्या परम दुष्ट रावणाचा सखा भाऊ बिभीषण यानें श्रीरामचंद्राची संगती धरिली तर त्यांत त्याचा तरणोपाय झाला. आणि रावणाचा सर्वस्वी नाश होऊन बिभीषण राज्यपद पावला. अशीं उदाहरणें शेकडों आहेत.

याप्रमाणेंच दुर्जनांच्या संगतीनें चांगल्याचा नाश झाला. अशीं उदाहरणें आपणास आढळतील. पाराच्यारी दुर्योधनाचा आश्रय धरून राहिल्यामुळें महान योग्य भीष्माच्यार्य, द्रोणाच्यार्य इत्यादिकांचा कुरुक्षेत्रामध्यें नाश झाला. कर्णासारखा उदार आणि शूर पुरुष पृथ्वीवर दुसरा झाला नाहीं; तशाचाही दुष्टाच्या संगतीनें नाश झाला. अलीकडच्या इतिहासांतही अशा गोष्टी आपणास आढळणार नाहींत असें नाहीं. राजा शिवाजी याला श्रीरामदास स्वामी, दादोजी कोंडदेव यांची संगती होती तर ता सामान्य प्रतीचा मनुष्य असतांही राजा झाला तसेंच त्याच्या उलट पहा ! त्याचाच पुत्र संभाजी राजा कलुशा वगैरे व्यसनी लोकांच्या संगतीस लागला तर प्राणास मुकला. प्राणास मुकला एवढेंच नव्हे, राजे लोकांस अति निंद्य अशी त्यानें आपली अप्रतिष्ठा करून घेतली. औरंगजेब बादशहानें त्याला कैद तर केला, त्याचे डोळे तर काढले, डोक्यात मेख तर ठोकल्या ! हर हर ! केवढा अपमान कुसंगतीच्या योगानें झाला ! असाच अलीकडील आपले शेवटचे पेशवे रावबाजी यांणीं त्रिंबकजी डेंगळे वगैरे हलकट मंडळीच्या संगतींत राहून दुर्लौकीक मिळविला त्यानें स्त्रियांचें गोकुळ माजविलें, व्यभिच्याराला तजेला आणिला, श्राद्ध संकल्पाचा, तिळा तांदळाचा सुकाळ केला, तरवारीला म्यान केलें आणि दर्भाचे बाग लाविले. तेणेंकरून परिणामही तसाच झाला. इकडे इंग्लिश लोक लढाईला आले आणि तिकडे राव बाजी बायकात जाऊन लपले! शेवटीं राज्य गमावून गंगेच्या कांठीं ब्रह्मयज्ञ करीत स्वस्थ राहिले. असे असे दुष्ट संगतीचे दुष्ट परिणाम झाले आहेत. पुढें चालू.

## कौमुदीमहोत्साह.

या अत्यंत उपयोगी त्रैमासिक पुस्तकामध्यें "सिद्धांत कौमुदी" संस्कृत व्याकरण, आणि त्याचा शुद्ध मराठी अर्थ. स्पष्टीकरणार्थ भरपूर टीपा, आणि पाणिनीयादि सर्व आधारग्रंथ देऊन, आणखी दुसऱ्या अनेक सोई केल्या आहेत. आजपर्यंत पांच खंड प्रसिद्ध झाले. यांत संज्ञा, परिभाषा, पंचसंधि, षड्लिंग, अष्टाध्यायी, गणपाठ, धातुपाठ लिंगानुशासन शिक्षा अनुवृत्तिपूर्व भाग इतकें संपूर्ण झालें. पुढील प्रकरण चालू असुन क्रियापदाला आरंभ केला आहे. शिवाय दोनशें शब्दांच्या संपूर्ण विभक्ति चालवून दाखविल्या आहेत. कागद चांगले, सांच्या मोठा, छापणी सर्वोत्कृष्ट, प्रत्येक खंडांत १०० पृष्ठें, किंमत इतर पुस्तकांच्या मानानें फारच अल्प ह्मणजे प्रत्येक खंडाला केवळ एक रुपया, टपालखर्च एक आणा. पण वर्षाची वर्गणी आगाऊ चार रुपये पाठविल्यास टपोल खर्च नाहीं, या पुस्तकाविषयीं मोठमोठ्या पंडितांनीं उत्तम अभिप्राय दिले आहेत. ज्यांस हीं पुस्तकें घ्यावयाचीं असतील त्यांही कृपा करून आह्मांस "पोष्टपेड" पत्रीं कळावें. ह्मणजे पुस्तकें पाठविलीं जातील.

रामचंद्र भिकाजी गुंजीकर
कौमुदीमहोत्साहकर्ते
मुंबई काकडवाडी घर नं. ८

## रामजोशीकृत कविता.

अथवा.

लावण्या भाग दुसरा

ह्या पुस्तकाची प्रथमावृत्ति लवकरच खलास झाल्यामुळें हल्लीं दुसरी आवृत्ति विशेष सुधारून टाइपावर छापविली आहे. प्रथमावृत्तीपेक्षां या खेपेस कांहीं उत्कृष्ठ नवीन लावण्या घालून टीपा वगैरे दिल्या आहेत. त्यांची किंमत पूर्वीप्रमाणें अगदी थोडी ह्मणजे आठ आणे ठेविली असून परगांवीं मात्र टपालखर्चाबद्दल रुपीं आणा अधिक पडेल; पुस्तकें पुण्यास आमच्याकडेस किंवा 'ज्ञानप्रकाश' व शिवाजी छापखान्यांत व मुंबईस 'इंदुप्रकाश' छापखान्यांत मिळतील. कळावें ता० १८ डिसेंबर सन १८७८ इसवी.

शंकर तुकाराम शालिग्राम.

वऱ्हाडसमाचार छापखान्यांतही हीं पुस्तकें विक्रीकरितां आलीं आहेत.

## नवी जाहिरात.

आह्माकडे प्रसिद्ध लोकहितवादींनीं कित्येक पुस्तकें ठिकाठिकाणच्या लायब्रऱ्यांस ( पुस्तकालयास ) बक्षीस देण्याकरितां ठेविलीं आहेत. ह्याचा लाभ ज्या लायब्रऱ्यांस पाहिजे असेल त्यांचे चिटणिसांनीं अर्ध्या आण्यापासून ९ आण्यापर्यंत पोष्टाचीं टिकिटें पाठविल्यास तितक्या टपाल खर्चांत जितकीं पुस्तकें पाठवितां येतील तितकी पाठवूं मात्र पत्रावरोबर लायब्ररीच्या ठिकाणच्या कोणा सभ्य गृहस्थाची ओळख असावी. ज्या लायब्रऱ्यांस लोकहितवादींचीं पुस्तकें गेलीं असतील त्यांची यादी चिटणिसांनीं पाठविल्यास त्या पुस्तकांशिवाय इतर पुस्तकें पाठविण्यांत येतील. कळावें ता. २०-१-१८७९ इ०

हरी त्र्यंबक काळे.
नासिक वृत्ताचे मालक

## कुटुंबमंत्री.

हीं पुस्तकें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विकावयास आलीं आहेत, किंमत सहा आणे. बाहेर गावीं मागविणारास एक आणा शिवाय लागेल.

## जाहिरखबर.

वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खालीं लिहिलेले जिन्नस व पुस्तकें विकत मिळतात.

| | किंमत. |
|---|---|
| गजकरणाच्या डब्या | ८१ |
| भ्रांतिकृत चमत्कार अथवा कामेडी आफ एरर्स | ८६ |
| वैद्यप्रकाश. | २८८ |
| नादारीचे नियम. | ८८ |
| शिक्षणसार | ८१२ |
| नवीन दिवाणी कायद्यावरील सर्क्युलरें | ८६ |

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १३ अकोला, रविवार ता० १६ माहे फेब्रुवारी सन १८७९ इसवी. अंक ७


## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणार लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी झणजे पत्र सुरू केले जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## भालचंद्र बाबाजी उर्फ तात्या जोशी याचा शोध पाहिजे.

## २५ रुपये बक्षीस.

आमचा जवळचा आप्त चि० भालचंद्र बाबाजी ऊर्फ तात्या जोशी हा सातारा जिल्ह्यांतील पाटण तालुक्यांतील मरळी गावचा रहाणारा आहे. याचें वय सुमारें ३० वर्षांचें आहे. अडीच वर्षें झालीं हा कांहीं रागानें घर सोडून निघून गेलेला आहे. परंतु हल्लीं त्यानें परत घरीं येण्याची फार जरूरी आहे. कारण त्याला दोघ बंधू बाळकृष्ण आणि वामन या नावाचे २५ व १६ वर्षांच्या वयाचे होते ते दोह महिन्या मागें २० दिवसाचे अंतरानें एकदम मरण पावले व त्यांच्या २० व १४ वर्षांच्या वयांच्या स्त्रिया विधवा झाल्या आहेत. भालचंद्र तात्या याची बायकोही २५ वर्षांची आहे व त्याला एक पुत्र झालेला मरण पावला आहे. व त्याचे ५५ ६० वर्षांचे आई बाप शोक सागरांत निमग्न होऊन दुःख भोगीत पडे राहिले आहेत. त्यांना आतां चिरंजीव भालचंद्र ऊर्फ तात्या याची भेट होणें एवढेच काय तें जीव धारण करण्यास साधन उरलें आहे. या वृद्ध मातापितरांस तिघच एवढे पुत्र झाले होते त्या शिवाय चवथें अपत्य मुलींच झालें नाहीं आणि ते एवढाले मोठे झाल्यावर एकदम आकाश कोसळल्यासारखा हा भयंकर प्रसंग त्यांतील दोघावर आला व तिसरा देशांतरास गेला. हें ऐकून मोठ्या पाषाण हृदयी मनुष्यास ही द्रव आल्या वांचून रहाणार नाहीं. मग प्रत्यक्ष त्यांचा पोटचा गोळा भालचंद्र तात्या यास आईचा वाचून कसा राहील? ही गृहस्थिति ऐकून कळल्या बरोबर तो असेल तेथून परत येईल अशी आमची खात्री आहे. तो मनाचा कोंवळा असून स्वभावानें गरीब आहे. वऱ्हाडांत ४।५ वर्षे तो होता, छापखान्यांतील टाईप जोडण्याचें काम शिकलेला आहे. नाशकास छापखान्यांत होता. व क्षेत्र काशी एथे जाऊन परत आला होता. ग्वालेरीस असल्याची एकवार वार्ता कळली होती. एखादे नाटकांत असेल असेंही कोणी बोलतात तर जेथें असेल तेथें त्याला या त्याच्या घरच्या घडलेल्या दुःखदायक गोष्टीची जे कोणी खबर देतील, उपदेश करितील व रागें भरून घरीं पाठवितील अथवा वऱ्हाडांत अकोल्यास आह्माकडे त्याला जाण्यास सांगतील अगर त्याकडून आह्मांस पत्र लिहवितील किंवा ते स्वतां त्याविषयीं आह्मास माहिती कळवितील तर येणें करून त्याचा आह्मांवर उपकार होईल एवढेंच नव्हे तर तात्याच्या वृद्ध मातापितरांस जीवदान दिलें असें होईल. आह्मी ही जाहिरात वर्तमानपत्रांत छापून शिवाय हिच्या पुष्कळ प्रति काढून मोठमोठाल्या ठिकाणीं व वेगवेगळ्या नाटककारांकडे व छापखान्याकडे शोध लागेल या आशेनें पाठवीत आहो. तर परमेश्वर या आमच्या प्रयत्नास सहाय देवो.

परोपकारी अनोळखी मनुष्यास अथवा बक्षिताचे आशेनें कोणा गरीबास शोध काढण्याकरितां भालचंद्र ऊर्फ तात्या याविषयीं माहिती देतो. त्याचा रंग गोरा आहे. अंगानें सडपातळ आहे. तोंडावर थोडे देवीचे वण आहेत. व नाक लांबट असून पुढें थोडें रुंद आहे. वय ३० वर्षांचें आहे. सर्वांस कळावें, तारीख १० फेब्रुवारी सन १८७९ इसवी.

खंडेराव बाळाजी फडके
वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## जाहिरखबर.

वऱ्हाडसमाचार छापखान्यात खालीं लिहिलेले जिन्नस व पुस्तकें विकत मिळतात.

| | किमत. |
|---|---|
| रामजोशाच्या लावण्या | ०८ |
| भ्रांतिकृत चमत्कार अथवा कामेडी आफ एरर्स | ०६ |
| वैद्यप्रकाश. | २०८ |
| नादारीचे नियम. | ०८ |
| शिक्षणसार | ०१२ |
| नवीन दिवाणी कायद्यावरील सर्क्युलरें | ०६ |

## गजकरणाचें औषध.

आमचे छापखान्यांत गजकरणाचे औषधाच्या डब्या विकावयास आल्या आहेत हें औषध खात्रीचें असून यापासून गुण लवकर येतो. लावतांना आग मुळींच होत नाहीं. औषध थंड पाण्यांत भिजवून गंधाचे उटीप्रमाणे पातळ करून स्नान केल्या नंतर लावावें. किंमत ०६ सहा आणे हें औषध गजकरण शिवाय करून खरूज, व नायटे यांजवरती चांगले प्रकारे लागू होतें.

*** या गजकरणाच्या औषधाच्या डब्या दोन वर्षां पूर्वीं आमचे छापखान्यांत विक्री करितां होत्या व त्यापासून पुष्कळांस गुणही आला. परंतु अलीकडे सदर्हू औषधाच्या डब्या आमचे जवळ शिल्लक नव्हत्या व तेणेंकरून या रोगानें पिडलेलीं गिऱ्हाइकें परत गेलीं झणून आह्मी ह्या औषधाच्या डब्या मुद्दाम आणिल्या आहेत ता. १६ फेब्रुवारी सन १८७९ इसवी.

## कुटुंबमंत्री.

हीं पुस्तकें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विकावयास आलीं आहेत, किंमत सहा आणे. बाहेर गावीं मागविणारास एक आणा शिवाय लागेल.

## जाहिरात.

## कौमुदीमहोत्साह:

या अत्यंत उपयोगी त्रैमासिक पुस्तकामध्यें "सिद्धांत कौमुदी" संस्कृत व्याकरण, आणि त्याचा शुद्ध मराठी अर्थ, स्पष्टीकरणार्थ भरपूर टीपा, आणि पाणिनीयादि सर्व आधारग्रंथ देऊन, आणखी दुसऱ्या अनेक सोई केल्या आहेत. आजपर्यंत पांच खंड प्रसिद्ध झाले. यांत संज्ञा, परिभाषा, पंचसंधि, षड्लिंग, अष्टाध्यायी, गणपाठ, धातुपाठ, लिंगानुशासन विद्या अनुवृत्तीपूर्व भाग इतकें संपूर्ण झालें. पुढील प्रकरण चालू असून क्रियापदाला आरंभ केला आहे. शिवाय दोनशें शद्बाच्या संपूर्ण विभक्ती चालवून दाखविल्या आहेत. कागद चांगले, सोज्या मोठा, छापणी सर्वोत्कृष्ट, प्रत्येक खंडांत १०० पृष्टें, किंमत इतर पुस्तकांच्या मानानें फारच अल्प झणजे प्रत्येक खंडाला केवळ एक रुपया टपालखर्च एक आणा. पण वर्षाची वर्गणी आगाऊ चार रुपये पाठविल्यास टपाल खर्च नाहीं, या पुस्तकाविषयीं मोठमोठ्या पंडितांनीं उत्तम अभिप्राय दिले आहेत ज्यांस हीं पुस्तकें घ्यावयाचीं असतील त्यांही कृपा करून आह्मांस "पोष्टपेड" पत्रीं कळवावें. झणजे पुस्तकें पाठविलीं जातील.

मुंबई काकडवाडी घर नंबर ८ } रामचंद्र भिकाजी गुंजीकर, कौमुदीमहोत्साहकर्ते.

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. आपणाकडे खालील चार ओळी लिहून पाठविल्या आहेत. त्या छापून प्रसिद्ध कराल अशी आशा आहे. सालाबाद प्रमाणें चालूं सालीं पौष शुद्ध १९ मेला कसबे फत्तेखेडें एथें श्री खंडोबाची यात्रा भरली होती माल पुष्कळ व्यापारी लोकांनीं आणिला. दहा दिवसपर्यंत यात्रा मनुष्यांच्या भिरीनें भरली असून उचले लोकांचीही फार कसरत चालू होती. परंतु बंदोबस्तास रा. रा. लोचन सुकूल पोलिस चिफ कानस्टेबल आणि लेनासिंग हेड का० व रिझर्व पैकीं पांडू हेड का० यानीं फार कोसीस करून श्रम केले. व पांच गुन्हे घडले, ते सर्व पत्यांत आणिले. लोक सुमारें दहा हजारांवर होते. सर्व लोक हांशी खुशीनें यात्रा खलास झाल्यावर आपआपल्या घरीं गेले कोणाचें कांहीं नुकसान झालें नाहीं. याज करितां सदरील पोलीस आफिसरांची बंदोबस्ता विषयीं तारीफ केली पाहिजे. चीफ० हे चार वर्षांपासून एथें असून ह्या यात्रेचा चांगला बंदोबस्त ठेवित असतात.

हे रा. रा. लोचन सकूल चीफ का० जातीचे कनोजे ब्राह्मण असून पुष्कळ दिवस पर्यंत सेंट्रल प्राविन्स (नागपुरास) पोलीस चीं० का० होते. ह्यांची वर्तणूक चांगली आहे लोकांचा स्नेह व सरकारी कामाचा बंदोबस्त ठेऊन यांनीं विद्याभ्यास चांगला केला आहे. ज्योतीष, वैद्य शास्त्र व मंत्र शास्त्र ह्या तिन्ही शास्त्रांची चांगली माहिती असून ह्या वऱ्हाडांत दुसरा कोणी असा मनुष्ये आढळत नाहीं.

एके दिवशीं पुष्कळ मंडळीचे समक्ष लोकांनीं प्रश्न केले त्यास त्याच वेळेस त्यांनीं उत्तरें कागदावर लिहून दिलीं ते सर्वांचे भाव त्यांचे लिहिल्याप्रमाणें बरोबर मिळाले. हे जन्मकाळ फार चांगला शोधून करितात. जन्मपत्रिकेवर जशी फलश्रुति लिहून देतात तशी ती सर्व बरोबर मिळते वैद्यकीमध्येंही यांस परिज्ञान आहे. नाडी पाहून तत्क्षणीच सांगतात कीं अमुक रोग असून सदर्हू रोगी इतक्या दिवसांत मरेल तर तसेंच घडून येतें. याप्रमाणें पुष्कळ खात्री झाली आहे. दुसरे दोन चार गोष्टींचे असें पहाण्यांत आलें कीं, कोणत्याही गोष्टीविषयीं कांहीं मंत्रसाधन केलें असतां तें काम जितक्या दिवसांची मुदत देतात तितक्या दिवसांत घडून येतें. असेंही पुष्कळ लोकांस अनुभव आले आहेत. वरील चीफ साहेबांचा चमत्कार ज्योतिषाविषयीं, वैद्यकीविषयीं व मंत्रशास्त्राविषयीं फार लोकांस पुणें, मुंबई, नाशिक, बडोदा, नागपूर, जबलपुर वगैरे ठिकाणचे लोकांस ठाऊक झाला आहे. दूरदूरचे लोक आपआपल्या जन्मपत्रिका वगैरे लिहून पाठवितात व एयून हे गृहस्थ त्यांचीं उत्तरें देतात आजपर्यंत चीफ साहेबावर सरस्वती ची पूर्ण कृपा आहे.

रा. रा. पंडित लोचन सुकूल चीफ का० ह्यांनीं आपले अंकात लिहून आलेले भविष्य अवलोकन केल्यावरून भविष्य

कर्त्यांस विनंती पूर्वक प्रश्न केला तो येणें प्रमाणें. याचें उत्तर पुढील अंकांत मिळेल अशी आशा आहे.

प्रश्न.

काहां ग्यानका ग्यान, पवनका खंब काहा है,

काहां गोरखका गुरु, गौरकी माय कांहा है,

काहां अग्निकी खान, सुरजके बान कांहां है.

कोन ग्रंथ ज्योतिषका कीं जिस्से भाविष्य कर्तेनें भविष्य कहा है.

कोनसी नगरी कोन संस्थान, कोनसे लोक बसे प्रधान. कोन राजा कोन महंत, कहो भविष्यकर्ता नगरीका अंत,

अर्थ— ज्ञानी जीं मनुष्यें आहेत त्यांच्या ज्ञानाचें स्थान कोठें आहे? पवन ( वायु ) याचा खांब कोठें आहे, आणि गोरख नावांचा गुरु हल्लीं कोठें आहे, व कोण्या कामीं आहे. गौर ( पार्वती ) इची माय कोठें आहे ही पार्वती कोणाचे पोटीं जन्मली. आणि अग्नीची ( विस्तवाची ) खाण ( खदान ) ह्याची उत्पत्ति कोठून व कोठें आहे. सूर्य नारायणाचे बाण कसे व कोणत्या ठिकाणीं आहेत. आणि भविष्याचें नगर व स्वस्थान कोणतें आहे. ह्या नगरांत कोणकोणतें जातीचे लोकें वास करितात. तेथील राजा कोण व प्रधान कोण व त्या नगरांत किती लोकसंख्या आहे.

हें सदर्हू उत्तरी लिहून येईल असी आशा बाळगून तसें झाल्यास भविष्य कर्त्याचे फार आभारी होऊं.

---

## वऱ्हाडसमाचार

मिति माघ कृष्ण १० शके १८००

---

## दैवशाली घराणें.

या जगतांत मनुष्यास सर्व प्रकारचें सुख असणें ही एक ईश्वराची मोठी देणगी होय. व ही ज्याला आहे त्याला च दैवशाली ह्मणतात. अशीं घराणीं फार थोडीं असतात. खरोखरच चांगल्या गोष्टींची दुर्मिळता सर्वत्र आहेच. या दुनियत नानाप्रकारचे मनुष्यास नानाप्रकारच्या अडचणी असतात. कोणे गोष्टीचें सुख असलें तर बहुत गोष्टींचें दुःख असतें. ह्मणून कोठेंच कांहीं दुःखाचा लेश नाहीं व सर्व प्रकारानें विपुल सुख ज्या घराण्यास आहे त्याची योग्यता मनुष्याचे दृष्टीनें व ईश्वराचेही कृपेनें फार मोठी समजली पाहिजे.

आमचे प्रांतांत असें घराणें सांप्रत मे. दस्तुर बहिमनजी साहेब असिस्टंट कमिशनर यांचें आहे. ते अदल इग्रजांपासून वऱ्हाडांत लहान नोकरीपासून वढून आज पहिले प्रतीचे असिस्टंट कमिशनराचे हुद्यावर आले आहेत. यांस नुकतीच "कंप्यानियन आफ धि इंडियन ऐंपायर" ही अति मानवान पदवी मिळाली आहे. यांस एकच पुत्र असून ते सुपुत्र व कुळदीपक असे आहेत त्यांचें नाव मि. एदलजी साहेब हे एथेंच विद्याभ्यास करीत होते. यांस यांच्या घराण्याच्या योग्यतेवरून अलीशान रेसिडेंट साहेब बहादुर यांनीं २०० रुपये पगाराचे एकदम अध्याची केलें होते व तें काम त्यांनीं हुशारीनें केल्यावरून यांस ५०० रुपये पगाराची असिस्टंट कमिशनरची जागा नुकतीच मिळाली. हे स्वभावानें, विद्येनें व हुशारीनें आपले घराण्यास शोभायमान करणारे असेच आहेत. मे. दस्तुर बहिमनजी साहेबांचे जामात मि. असाजी शेट ह्मणून आहेत. तेही चांगले हुशार असून त्यांस ७०० रुपये पगाराची जेलावरील इन्स्पेक्टरची जागा निजाम सरकारानें दिली आहे. याचप्रमाणें बहिमनजी साहेबांचे सर्व बंधू एकाहूनएक अनुपम असे आहेत. सर्वांत वडील मे. दस्तुर साहेब हे पुण्यास असतात. हे सर्व पार्शी ज्ञातीचे शंकराचार्य आहेत. व सरकारांतून यास महत्तर मान आहे निजाम सरकारांनीं नुकतेंच यांस आपले राजधानीस बोलावून नेलें होतें व त्यांस वस्त्र भूषणें देऊन त्यांचा मोठा मान केला होता. दुसरेही बंधू मे. रतनजी साहेब हे निजाम सरकारांत रिविन्यू कमिशनरच्या हुद्यावर १५०० रुपये पगारावर आहेत. तिसरे मि. होशंगजी साहेब पुण्यास डेकन कालेजांत प्रोफेसर असून ओरियंटल ट्रान्सलेटरचे १००० रुपये पगाराचे जागेवर त्यांची शिफारस झाली आहे. चवथे बंधू मि. बैरामजी साहेब हेही निजाम सरकारांत मोठ्या पदारूढ आहेत. असे एकाहून एक अद्वितीय पुरुष पाहून यांचे घराण्यावर ईश्वराची पूर्ण कृपा नाहीं असें कोणास तरी वाटेल काय? वऱ्हाडांत बहिमनजी साहेबासारखा नेटिव कामदार दुसरा नाहीं. साऱ्या युरोपियन लोकांचे यांच्या ठायीं बंधूप्रमाणें प्रेम आहे. कोणतेही काम यांकडे सोपविलें ह्मणजे तें फत्ते झालेंच. याचप्रमाणें नेटिव लोकांतही यांची मोठी वजनदारी आहे. बहिमनजी सा. चे अल्पश्रमानें व एका शद्बानें जें काम होतें तें इतर मोठ्याही कामदारांच्या दीर्घप्रयत्नानें व पुष्कळ व्याख्यानानेंच होणार यांत संशय नाहीं. याप्रमाणें यांची अब्रू आहे. यांचा लौकिक आहे, यांचें घराणें नामांकित आहे, संतती आहे. संपत्ति आहे, सर्व बंधु एका विचारानें आहेत ही गोष्ट परम वर्णनीय होय यांत संशय नाहीं. व इतकें सर्व घडून येण्यास मोठी पुण्याई पाहिजे हें खचित. व तो बहिमनजी साहेबांच्या ठिकाणीं पूर्ण वास करिते ह्मणून त्यांस उत्तम दैवशाली ह्मटलें पाहिजे.

---

## अकोलें जिल्ह्यांत विद्याखात्यास सहाय.

पैसेवाले पुष्कळ लोक असतात परंतु पैशाचा चांगला व्यय करण्या विषयींत्यास सल्ला सांगणारे चांगले लागतात. त्याच प्रमाणे विद्वान व कामदार पुष्कळ असतात. पण त्यांच्या विद्वत्तेचा व कामगिरीचा लोकांस उपयोग होईल अशी त्यांची योजना व्हावी लागते. या गोष्टीचा हल्लीं आमचे अकोलें जिल्ह्यांतील विद्याखात्यास उत्तम योग आला आहे असें आह्मांस वाटतें. रा. रा. बजाबा रामचंद्र प्रधान अकोल्याचे डिपुटी इजुकेशनल इन्स्पेक्टर चांगले विद्वान असून मोठे कुशल व व्यवहारदक्ष आहेत. व दैवयोगानें आमचे डिपुटी कमिशनर मेजर बुलक साहेब एथें असल्यानें दुधांत साकर असा त्यांचा मिलाफ जमून विद्याखात्याकडील काम प्रशंसनीय असें चाललें आहे. मे० बुलक साहेब चांगली आस्थापूर्वक नजर शाळा खात्याकडे देतात, तहशिलदारांनीं मदत द्यावी असें त्यांस कळवितात, व गावोगावीं लोकांसही उत्तेजन देतात. ह्या योगानें व रा. रा. बजाबा रामचंद्र यांचे करामतीनें या जिल्ह्यांतील काम फार उल्हासानें चाललें आहे व तेणेंकरून इकडील गाव गन्ना अप्रसिद्ध असलेल्या लोकांचे औदार्य लोकदृष्टीपुढें येऊन त्यांची मोठी कीर्ति होत आहे हें पहून आह्मांस फार संतोष वाटतो. तेल्हाऱ्यास शाळागृहाला गावकऱ्यांची मदत असावी अशा विषयीं बजाबांनीं तेथील लोकांस सांगतांच च्यार तासांत एक हजार रुपयांची यादी तेथील मंडळीनीं तयार करून दिली. व तींत रा. रा. मनाजी दशमुख या एकट्या गृहस्थांनीं २०० रुपये दिले. हें औदार्य सामान्य नव्हे! याचप्रमाणें आणखी कित्येक गावच्या लोकांनीं बजाबांच्या शद्बास मान देऊन बऱ्याच रकमा शाळांकडे देण्याचें कबूल केलें आहे. त्यांतील कांहीं गाव आह्मांस ठाऊक झाले आहेत ते:— पाथर्डी ४७९ रुपये, उमरे ३०० रुपये, लाडणापूर २०० रुपये, व सुनगाव १०० रुपये, महिसांगचे रा. रा. बाबु सखाराम ज्यांनीं अकोल्याचे टौनहालांतील कारंजास ७०० रुपये दिले त्यांनींही तेथील शाळेच्या मदती करितां २५० रुपयांची यादी दिली आहे. अकोटचे रा. रा. गर्बासिंग जमादार यांनीं शाळेला कांहीं पुस्तकें, वर्तमानपत्रें वगैरे देऊन लायब्ररी स्थापन करितो अशी विनंती केली आहे. तसेंच तेथील दुसरे ग्रहस्थ रा. रा. शिवचरण शेट यांनीं १२ रुपये दरमहाचा एक असिस्टंट शाळेला आह्मी देतों असें कळविलें आहे. व असे कित्येक शाळांना असिस्टंट देण्याचें गाव कऱ्यांनीं कबूल केलें ते गाव आह्मास समजले आहेत ते:— उगवे, पाथर्डी, अकोली, अकोलखेड, हिवरखेड, सोनाळे वगैरे. याप्रमाणें बहुत लोकांकडून अकोला जिल्ह्यांतील शाळांस सहाय मिळालें आहे ही गोष्ट त्यांस व त्यांचे प्रवर्तकांस भूषणार्ह आहे.

नवीन शाळागृहे बांधण्याचेंही काम या जिल्ह्यांत झपाट्यानें चाललें आहे. हल्लीं ३० शाळा गृहें रा. रा. बजाबा रामचंद्र यांनीं केलेल्या नकाशा बमहुकूम यांचे देखरेखीखालीं चालू आहेत. त्याचप्रमाणें गावठी शाळांस ग्रांटस इन एड ह्मणजे सरकारी मदत मिळविण्याचें कामीं ८ गावचे अर्ज बजाबाकडे आलेले त्यांनीं पुढें सांगशनास पाठविले आहेत याप्रमाणें अकोला जिल्ह्यांतील शाळांचा भरभराट आहे तशी दुसऱ्या जिल्ह्यांत नाहीं ती व्हावी व सर्वत्र असें चांगलें काम चालून ठिकठिकाणचे लोकांचें औदार्य उदयास येऊन त्यांची कीर्ति व्हावी असें आह्मी च्याहतों.

---

## दुसरी नवीन लढायी.

काबुलाकडील लढायी अजून संपली नाहीं तोंच आमच्या इंग्लिश सरकारानें दुसरी एक लढायी सुरु केली आहे. ही आफ्रिका खंडाच्या दाक्षिण भागास झुलू नावाच्या काफर लोकांशीं आहे. त्यांच्यामध्यें व इंग्लिश सरकारामध्यें कांहीं गैर समजूत झाल्यावरून बरेच दिवस झाले मुंबईचे माजी गवरनर सर बार्टल फ्रियर साहेब हे विलायतेहून त्यांकडे गेले होते. पण झुलू लोकांचा राजा सेटिवियो यानें त्यांची गोष्ट ऐकिली नाहीं किंवा त्यांचा त्यांचा समेट झाला नाहीं व जुन तक्रारी चालल्या होत्या इतक्यांत त्या राजानें वीस हजार लोकांनिशीं ब्रिटिश फौजेवर तुटून पडून तिचा पराभव केला. त्या फौजेंत २४ वे पलटणीच्या ५ कंपन्या, ६०० काळी फौज व तोफखान्याची एक तुकडी होती या पैकीं ५०० लोक मारले गेले १ कर्नल, २ मेजर, ८ कप्तान, १४ लेफटेनंट, व २ कार्टर मास्तर व नेटिव पलटणीवरील २१ आफसर इतके मरण पावले किंवा यांतून कांहीं मरण पावले व कांहीं नाहींसे झाले व सरकारी दारू गोळा शत्रूचे हाती लागला असें वर्तमान आलें आहे. झुलू लोकांचाही नाश थोडा झाला आहे असें नाहीं. त्यांचे ५००० लोक मरण पावले. ही मोठी लढायी ह्मणावयाची. हल्लीं सर बार्टल फ्रियर साहेबांनीं फौजेची कुमक मागितली आहे व ती विलायतेहून आणण्याची सिद्धता झाली आहे असें कळतें. लवकरच शत्रूचें पारिपत्य होऊन ब्रिटिश फौजा विजयी होऊन मार्गे परतती ल. व सेटिवियो राजाचें राज्य खिळखिळी होईल यांत संशय नाहीं. एवढा प्रसंग येईल असें फ्रियर साहेबांस अगाऊ कळतें तर ते इतका नाश होण्या जोगें असावध न रहाते असें आह्मांस वाटतें. तेव्हां यांत कांहीं तरी फसगफलत असावी असाही तर्क आहे. लवकरच सर्व तथ्य समजेल.

---

## अफगाणिस्थान प्रकर्ण.

या आठवड्यांत काबुलाकडे पुढें सरसी झाल्याविषयींचें कांहीं वर्तमान नाहीं. तरी लवकरच ब्रिटिश फौजा काबुलावर, गिझनीवर, व हिरातावर जातील अशी वर्तमानें आहेत. अमीर पळून गेला व याकुबखानावर ब्रिटिश सरकार लोभ करीत असे ह्मणून तो शरण येऊन वादाचें तोंड लवकर मिटवील असें वाटत होतें पण तसा रंग दिसत नाहीं. अमीराचे धोरणानें तो

वागत आहे. व जब्बालाबोस जे काबुलीं सरदार ब्रिटिश सेनापतीस शरण गेले यांचा राग धरून याने काबुलांतील यांची मालमत्ता लुटविली यामुळें काबुलच्या कित्येक सरदारांचें व याचें बाकडें पडलें आहे व कित्येक सरदार मुलामाणसांसुद्धां काबुलांतून निघून गेले. ब्रिटिश फौजा हिरातकडे जाणार ह्मणून अमीर शेर अलीही सैन्य जमाकरून तिकडे जाणार अशी कंडी आहे पण तींत कांहीं अर्थ दिसत नाहीं. अमीर मरण पावल्याचीही पुन्हा वार्ता निघाली होती पण आतां असे कळतें कीं मरण पावलेला अमीर काबुलचा नव्हे, बोखऱ्याचा आहे. काबुलच्या अमीराविषयीं विलायतेवरून रशिया देशांतून वर्तमान आलें आहे तें असें:—

अमीर शेरअली रशिया देशांत गेला हें वर्तमान खरें आहे. पण तो इंग्लिश लोकांचा काबुलांत भय झाला ह्मणून गेला असें नाहीं. इंग्लिशांची आगळीक रशियाचे बादशहास कळवून यास आपले सहायास येण्यास उत्तेजित करावें ह्मणून गेला. पण ती यास उगीच भ्रांती आहे. अमीराची भेट रशियाचा बादशहा मोठ्या सन्मानानें घेणार आहे अमीरानें काबुल सोडण्या पूर्वीं दरबार भरविला होता त्यांत रशियाला फार मोठेपणा देऊन त्याच्या हुकुमांत रहाण्यास आपण सिद्ध आहो असें याने बोलून दाखविलें होतें ह्मणतात. रशियाच्या बादशहाचा एडीकांप ऑरेनबर्ग एथें अमिरास सामोरा जाईल. समर्कंद आणि तासकंद एथील लोक अमीराच्या आगमनानिमित्त मोठा उत्साह करण्याच्या तयारींत आहेत. पारिस शहरांत अशी खबर आहे कीं बोखारा एथें अमीरास भय आहे ह्मणून रशियाच्या झारास याचे संरक्षणाकरितां लोक पाठविण्याची जरूर आहे. तरी झारानें निश्चय ठरविला आहे कीं अमीरास तुर्कस्थानांत राहू द्यावें. युरोपांतील रशियांत येऊं देऊं नये. अमीर ६ वे तारखेस तासकंदास पोंचणार होता. बादशहानें काफमन यांस बरोबर यास निमंत्रण पाठविलें. या बरोबर ९ हत्ती, २४०१ घोडेस्वार, खजिना सर्व स्त्रिया व सर्व प्रकारचें सामान आहे.

---

(लिहून आलेला मजकूर.)

आज सायंकाळीं जेवण खाण झाल्यावर विश्रांतीकरितां आपले बिछान्यावर निजलों. माझे निजण्याचे जागेपासून सुमार पांच सहा हातांवर एक दिवा असून तेथें दोन मनुष्यें आपआपलीं कामें करीत होतीं. मी आपल्या प्रपंचाच्या फिकिरीचा व ईश्वराच्या अत्युत्तम कार[illegible]ना विचार करीत असतां मला क्षणैक डोळा लागला, देहस्मृति नाहींशी झाली. इतक्यांत मजपुढें जीं मनुष्यें होतीं तींच पण मोठ्या कुळांतलीं असून महान् पराक्रमी मी जीं ठिकाणें पुढें सांगणार त्या ठिकाणापासून सुमार दोन शें कदमावर एका संगमरवरी दगडाचें सिंहासन बनावून एका समोर एक तोंडें करून मोठ्या मोठ्यानें बोलतात, हसतात, आणि एकमेकांचे हातावर हात देऊन आपआपले मत स्थापन करण्याकरितां झटत आहेत असें मी पाहिलें.

मनुष्यमात्राचा हा स्वभावच आहे कीं, कांहीं चमत्कार असेल तो अवलोकन करावा याचप्रमाणें तें अवलोकन करून मला तिकडे जावें व तें काय चाललें आहे हें पहावें असें वाटलें. मी आपल्या असलेल्या जागेपासून आणखी १०० कदम सुमार पुढें गेलों असेन तों यांचें बोलणें स्पष्ट मला ऐकूं आलें. तें मोठ्या चमत्काराचें आहे असें मला वाटल्यावरून मी तेथेंच उभा राहून एकाग्रचित्तानें ऐकूं लागलों, जेथून मी ऐकूं लागलों तेथूनच लिहितों.

एकजण ह्मणतो. "मित्रा, हल्लींचि राज्यामध्यें कशी काय गम्मत आहे! अरे तूं ह्मणत होतास ना? कीं, तुझें कांहीं चालणार नाहीं; पण आतां पहा बरें कसें काय झालें आहे. कालच मी आणखी असा एक हुकूम फरमाविला आहे कीं जो कोणी रस्त्यांत आढळेल त्यानें मला येऊन सलाम करावाच करावा. नाहीं तर मग पाठीवर दंड आणि गावांत धिंड अशी काढीन. तुह्मी आणि आह्मी एका यजमानाचे नोकर. एक सत्कर्माचा व एक दुष्कर्माचा. एक पोलिस, लोकांवर गुन्हे शाबित करणार, व एक न्यायाधीश नापुरावा ह्मणून खटले सोडून देणार. आणि ह्मणूनच मी तुह्माजवळ आपली गुह्य गोष्ट सांगितली." हें ऐकून दुसरा ह्मणाला, खरेंरे गड्या तूं ह्मणतोस हें खरें, परंतु हल्लीं लोकांनींच तुझा अंगिकार केला आहे पण तुजमध्यें जो एक अमोल्य गुण आहे तो लोकांना फसवितो. तो दिव्यासारखाच समजला पाहिजे. ह्मणजे दिवा हा प्रिय होण्यास फक्त याचा उजेड हाच होय. वस्तुतः तो तर सर्व काजळाचाच गाभा असा असतो. याचप्रमाणें न्याय न्याय ह्मणजे अन्यायाचें घर, विद्या विद्या ह्मणजे अविद्येचें माहेर. याचीं पाहिजे असल्यास थोडीं उदाहरणें देतों. हल्लींच पहा, माझे पहाण्यांत असें आलें आहे कीं, हिंदुस्थान हा देश इंग्लिश लोकांचे ताब्यांत गेल्यापासून किती सुधरत चालला! कलाकौशल्यें किती वाढलीं! जिकडे तिकडे सडका कशा शोभायमान दिसतात! फार काय पण पांच वर्षांचे मुलापासून जर पहाल तर आई बापानीं यांचे मागें टुमणें लावलेंच. बाळ्या ये. ह्मण ए, बी, सी, डी. अक्षरें झालीं ह्मणजे नोज कशाला ह्मणतात? ह्मणजे याचे नाकावर हात ठेवावा. याचप्रमाणें आय, इयर, माउथ वगैरे सांगावें. कदाचित मुलगा हट्टी असतें त्यानें पाठ न केलें तर अंतःकरणपूर्वक आई बाप असे ह्मणतांना पाहिले आहेत कीं हा केवळ ढ आहे हा बेटा पांच वर्षांचा घोडा झाला पण याला समजत नाहीं, हर! हर! खरेंच ते दुष्ट आई बाप! मला असें वाटतें कीं ते व्यापारांत धुर्त असतात; ज्यांना पैसे लाविले त्यांत ऐनरकम बायको आहेच, व्याजांत मुलगा झाला या व्याजापासून पैसा मिळावा कसा तर हा उपाय यांनीं योजलेला आहे. याला त्रास देऊन लहानपणापासून फिकिरींत घालावें ह्मणजे, थोडे दिवसांत चक्रवाढ व्याजानें पैसा वसूल व्हावयास लागेल. आतां कोणी असें ह्मणतील कीं मुलाचे हिताकरितां आई बाप झटतात असें असून तुह्मी दुषण लावता. याला काय ह्मणावें? पण छी:! हें मुलांचें हित नव्हे. तुह्मीच पहा कीं हल्लीं चांगले चांगले कुलीन, देखणे असे लोक सदरीं लिहिल्याप्रमाणें चक्रवाढींत आले आहेत. पण आह्माला खचीत वाटतें कीं यांनां स्वतांकरतां सुख मुळींच राहिलें नसतें. अन्न पचत नाहीं, डोळ्यांनीं दिसत नाहीं, कोणाला खोकला, कोणाला दमा, अशा व्याधीनें ते ग्रस्त होतात. या शरिरांतील खेळ मोठा सूक्ष्म आहे तो थोडा सांगतो.

पुढें चालू. )

---

## वऱ्हाड.

वऱ्हाडचें गेल्या सालचें उत्पन्न व खर्च समजलें आहे तो येणेंप्रमाणें:—

| | जमा. | खर्च. |
|---|---|---|
| सिव्हिल | ८२११६०९ | ३२३१३६६ |
| लष्करी | ६८२६० | ३२७२५८४ |
| पब्लिकवर्कस | ६७६२ | ८०७५०९ |
| स्टेट रेलवे | १६३५३३ | ६३००४ |
| लोकलफंड | १०३८१५८ | ९१७९५० |
| | ९४६८३१२ | ८२९२३१३ |
| बाकी शिलक | | ११७६००९ |

गुदस्त सालीं जमा ९२२९८२१ रु. व खर्च ७७६८३३६ रु. झाला आणि शिलक १४६१४८५ रु. राहिली.

या वर्षीं जमीन बाब उत्पन्न साठ लक्ष अठ्ठाविस हजार च्यारशें एकतीस रुपये झाले. मिठा बद्दल जमा गुदस्त सालपावेतों ६५००० रुपये होती. ती या सालीं ५५४१७ रुपये झाली. मिठाच्या पूर्वींच्या विहिरी पुन्हा खुल्या करून मीठ वऱ्हाडांत पिकविण्याविषयीं परवानगी देण्याचा विच्यार चालू आहे, सायरबाब उत्पन्न ९६४९०४ रुपये आहे. याचा तपशील. देशी दारू ७७६७५८ ताडी १७३१६ अफूवगैरे १६४४१४ विलायती दारू ९४१६ रु० मिळून एकंदर ९६४९०४ रुपये स्टांपाचें उत्पन्न ५१४.१९२ रुपये आहे. हें तीन वर्षांपूर्वीं ४०९८७५ रुपये होतें. वऱ्हाडची शिलक उरेल ती निजाम सरकारास द्यावयाची ती मागील सालअखेर एकंदर ५९२५१३३ रुपये होती पैकीं जुलै सन१८७७मध्यें १४७५००० रुपये दिले आहेत व बाकी ४४५०१३३ रुपये देणे होते आणि साधारण खर्चाकरितां दरसाल ४० लक्ष रुपये निजाम सरकारास द्यावयाच्या शिलकेंपैकीं राखून ठेवावे लागत असतात. तरी १०२५००० रुपये गेल्या वर्षींही मे महिन्याचे ९ वे तारखेस निजाम सरकारास दिले आहेत. व बाकी ३४२५१३३ रु. राहिले आहेत.

---

सोन्याची हलकी सापडलेली मालकास नक्कशारि न दिल्यामुळें रा. रा. कृष्णराव मुनसी यास २५ रुपये दंड झाला.

---

रेसिडेंट साहेबाच्या सही शिक्याचे खोटे हुकूम तयार करून गावचे पाटलास गुजरत नेऊन लाविले व जमिनी व माल वगैरे ताब्यांत घेतल्या अशा बाबद फौजदारींत एक मोठें प्रकर्ण एथें उपस्थित झालें आहे. यांत आरोपी हा पुण्याचे विष्णु केशव राहतेकर हल्लीं वस्ती अकोले यांच्या लटपटीचें हें कृत्य आहे असें सांगतो. तपास बारकाव्यानें सुरू आहे. डिपुटी कमिशनर साहेबानीं स्वतां एथें येऊन हा मुकद्दमा चालविला आहे. पुढें याविषयीं तपशीलवार लिहू.

---

मे० दस्तुर बाहिमनजी साहेब सी. आय. ई. यांचे घरीं पुण्यास मोठा लग्नोत्साह आहे. यांचे पुतणे मे० रतनजी साहेबाचे चिरंजीव व दुसरे नातू, नाती मिळून ७ मुलांचे विवाह माच्यांचे ११ वे तारखेस होणार आहेत व त्यांकरितां ते रजा घेऊन जाणार आहेत. याचे चिरंजीव मे० एदलजी साहेब यानींही पुण्यास जाण्याकरितां १ महिना १० दिवसांची रजा मागितली आहे.

---

आह्मास लिहिण्यास संतोष वाटतो कीं मे० एदलजी साहेबें अल्याची यास मे० अबदुल हक्क साहेब यांची रिकामी असलेली असिस्टंट कमिशनरची जागा मिळाली. आतां रा. रा. भीमराव साहेब अल्याची यांजलाही लवकर अशी जागा मिळो असें आह्मी इच्छितों.

---

मुंबईच्या नेटिव ओपिनियन पत्रांत लिहिलें आहे कीं, ह्मैसूर व कुर्गचे चीफ कमिशनर मि. जे. डी. गार्डन यांस हैद्राबाद एथें रेसिडेंट नेमणार व हैद्राबादचे हल्लींच रेसिडेंट सर रिचर्ड मीड यांस अफगाणिस्थानांत नवीन काबीज केलेले मुलखाचे मुख्य अधिकारी नेमणार अशी बातमी आहे.

---


## NOTICE.

The right to collect Bazar Cess in the Khamgaon Weekly Bazar during the Official year 1879—80 will be sold at Auction in the Municipal Office, on the 3 rd March at noon.

For particulars regarding the terms of sale &c. application may be made to the undesrsigned.

Khamgaon Municipal Office 14th Februery 1879.

A. J. Dunlop Vice President Municipal Committee Khamgaon

## जाहिरात.

खामगाव एथील आठवडे बाजारचें बा
जारसेस [ फी ] सन १८७९।८९ सा
बद्दल वसूल करण्याचा हक्क तारीख ३य
हे मार्च सन १८७९ रोजीं दुपारीं एथील
म्युनिसिपल कमिटीचे हापिसांत उघड लि
लावानें विकला जाईल.

विक्रीच्या शर्ती वगैरे विषयीं माहि
बद्दल खालीं सही करणाराकडेस अ
करावा.

( सही ) ए. जे. डनलाप.

व्हाइस प्रेसिडेंट खामगा

खामगाव म्युनिसिपल कामिटीचे आफि
तारीख १४ [illegible] सन १८७९.


---

## वर्तमानसार.

मुंबईच्या बंद झालेल्या गिरण्यांतून निघालेल्या मजूर लोकांनीं गेल्या सोमवारीं जमून मि. नसरवानजी पाजपाशीं आपल्या मजुरीचे पैसे मागितले. यांनीं लोकांस पुष्कळ समजून सांगितलें. परंतु ते ऐकत नाहींत तेव्हां पोलिसास बोलाविलें. पोलिसानीं तीन पुढारी मनुष्यास धरून नेऊन माजिस्त्रेटाकडून त्यांस दंड करविले. तेव्हां घरोघर मुकाट्यानें गेले.

चीन देशांत मोठ्या तोफा पाडण्याच्या कामीं दिवसानुदिवस अधिकाधिक सुधारणा होत चालली आहे.

विलक्षण परोपकारी गृहस्थ— कलकत्ता एथील प्रसिद्ध वैद्यराज बाबू रमानाथ सेन यांचें वैद्यकीचें उत्पन्न दरमहाचें तीन हजारांवर होतें. त्यापैकीं फक्त आपल्या प्रपंचाच्या रोजच्या खर्चांस लागेल तेवढें ठेवून बाकीचा पैसा परोपकारार्थ ह्मणजे गुणारें पन्नास विद्यार्थीस पढणें शिकवून त्यांचा खर्च चालवून तयार करण्याचा क्रम असे. या विद्यार्थीपैकीं कितीएकास इंग्रजी वैद्यकी शिकावी असें वाटलें त्यांसही मदत करवून त्यांजकडून अभ्यास करविला. हा क्रम मरेतोंपर्यंत चालला. त्याजमुळें पाठीमागें मुलांकरितां संचय करून ठेविला नाहीं. परंतु त्यांच्या मरणकालीं त्यांच्या उल्हाटालीप्रमाणें कांहीं साधारण देणें राहिलें तें आतां उत्पन्न नसल्या कारण मुळें मुलांस फार झालें आहे असें पाहून त्यांस कर्जमुक्त करून त्यांच्या स्मरणार्थ कांहीं स्मारक कृत्य करण्याकरितां फंड जमविण्याचा उद्योग त्यांच्या मित्रांनीं चालू केला आहे. त्या निमित्त आरंभ केल्याबरोबर ८ असामी मिळून सत्राशें रु० जमले असें समजतें. सु. प.

फमीन कमिशन फेब्रुवारी महिन्यांत मद्रास, हैदराबाद, सोलापुर, नगर, पुणे, सुरत, बडोदा, अहमदाबाद वगैरे ठिकाणीं फिरून सर्व माहिती मिळवून ता. १६ रोजीं मुंबईस येऊन आपलें काम संपविणार असें दिसतें.

संस्थान जंजिरा एथील नबाब सिद्दी इब्राहीम साहेब हे नुकतेच वारले व त्यांच्या जागीं गादीवर बसण्याच्या संबंधी कांहीं तंटा उत्पन्न झाला आहे व त्याच्या बंदोबस्ता करितां सरकारानें पन्नास शिपाई वगैरे लोक पाठविले असें समजतें.

कलकत्ता एथें ता. १ रोजीं स्टार आफ इंडिया या किताबाचे चांद देण्याचा मोठा समारंभ झाला. त्या प्रसंगीं शिंदे सरकारही तेथें होते. सर जान स्ट्राची यांस नैट ग्रँड कमांडर व आन. सर आश्ली ईडन व स्टुअर्ट बेली यांस नैठ कमांडर्स अशा पदव्या दिल्या.

फ्रान्स देशाचे मुख्य राज्याधिकारी बदलले आणि त्यांच्या पाठीमागून प्रधान मंडळीही बदलून नवीन नेमणुका झाल्या.

सुरतेंत महर्गता व दुष्काळाची चिन्हें वाढत चाललीं आहेत, त्या शहरांत हिंदु व मुसलमान भिकाऱ्यांची संख्या रस्त्यांतून फार वाढली आहे असें ह्मणतात.

मोरवीचे ठाकुर साहेबांची स्वारी येते एप्रिल महिन्यांत विलायतेस जाणार असें समजतें.

हुबळी व कारवार रेल्वे बांधण्याविषयींने कियेक दिवस घाटत आहे त्याची हल्लीं इंजिनियर पाहाणी करीत आहेत असें समजतें. कारवार पासून हुबळी पर्यंतचा रस्ता १०८ मैल होईल.

बंगलोरपासून म्हैसुरपर्यंत रेल्वेचा रस्ता बांधण्याविषयीं हिंदुस्थान सरकारानें मंजूरी दिली.

अफगाणिस्थानची एकंदर लोकसंख्या ६०,००,००० आहे पैकीं, काबूल शहरीं वस्ती ६०,००० कंदाहार ४०००० व हीरातची ४५,००० आहे असा अदमास केलेला आहे.

रशियन वर्तमानपत्रांचा लिहिण्याचा असा रोख आहे कीं, अफगाणीस्थान व इंग्लंड यांच्यांत जी हल्लीं लढाई सुरू आहे तिचा शेवट होणें तो इंग्लंड व रशिया या दोन राष्ट्रांची सरहद्द एकमेकांस मिळून ह्मणजे अफगाणिस्थान लयास जाऊन होईल. ने. ओ.

## संगती.

(मागील अंकावरून पुढें चालू.)

मनुष्य व्यवहारमार्गास लागला ह्मणजे त्याला संगतीची फार अपेक्षा असतें कारण हा एकलकोंडा रहाणारा प्राणी नव्हे. ह्मणून आपण एकादे अधिकारावर एकादें गावीं गेलों ह्मणजे पुष्कळ मनुष्यें आपणकडे येऊं लागतात. खरोखर ह्मणाल तर हीं आपल्या संगतीकरितां येतात असें नाहीं.. त्या अधिकार वैभवाकरितां येतात नाहींपेक्षां फक्त नवें मनुष्य आलें त्याला भेटावें इतकाच इरादा सर्व लोकांचा असतो तर देवालयांत अतिते अभ्यागत पुष्कळ येतात, धर्मशाळेंत गोसावी बैरागी नित्य येतात त्यांजकडे कोणी जात नाहीं. असो. असे लोक आपणाकडे येऊं लागले ह्मणजे नानाकार्याच्या उद्देशाचे ते असतात, कोणी स्वकार्यसाधक असतात, कोणी कोणाचे अडते असतात, कोणी आह्मी थोरा मोठ्यांचें स्नेही ह्मणविले जावे अशासांठीं येत असतात आणि राव साहेब, राव साहेब करून मीठ्ठा भाषणानें अशी साखर पसरून देतात आणि वायवार शब्दांनें असें छत करून देतात कीं सहजगत्या पाहिल्यास याच्या सारखा चांगला मनुष्य दुसरा थोडाच असेल असें वाटतें. व याची संगती निरंतर आपणास असावी असें मनांत येतें पण कधीं कधीं असे सिद्धांत आपण करून ठेविल्यानें फसून जातों. ह्मणजे त्या मनुष्याच्या नुसत्या फड मारणाऱ्या भाषणावर आपण जातों, याचे अंतःकरणाची अथवा कृतींची किंवा स्वभावाची आणि वर्तनाची परिक्षा करण्यास आपणास मुळींच प्रसंग आलेला नसतो. आणि तसे मनुष्य क्वचित प्रसंगीं आदर करण्यास अगदींच पात्र नाहींत असें असतात आणि तशांना आपण संगतींत घेतलें ह्मणजे शहाणे लोक आपली परिक्षा करून सोडतात मग आपण उपहासास पात्र होतो आणि येणेंकरून आपला फार तोटा होतो. सबब मंडळींतही अंतःकरणाची; स्वभावाची आणि अकृत्रीमतेची परीक्षा करून त्यासी दृढ संगती केली तीच सुसंगती होय असें समजलें पाहिजे आणि तद्व्यतिरिक्त जे मित्रत्वाचे प्रकार आहेत ते लोकाचार, व्यवहार, ओळख, भीडमुरवत इतक्यापुरतेच असतात., त्यांत अंतःकरणाच्या संगतीचा मेळ बसत नाहीं.

कधीं कधीं असेंही घडतें कीं कोणी गृहस्थ बोलण्या चालण्यांत चलाख नसता त ह्मणून ते आपले मनांत भरत नाहींत आणि त्यामुळें आपण त्यासी दृढ संगती करीत नाहीं तेणेंकरूनही आपणाकडुन चुकी घडण्याचा संभव असतो. ह्मणजे ते गृहस्थ साळसूद व चोख असल्यामुळें अधिक प्रसंगी नसतात ह्मणून बाता मारीत नाहींत. तर याही गोष्टीचा विचार केला पाहिजे. नुसत्या बोलण्यावर जाऊनये. उतावीळपणानें एकदम कोणाची परीक्षा करू नये. परीक्षा झाली तरी उत्सृंखलतेनें कोणास टाकून बोलूं नये. मनांत गाठ घालावी. आणि भल्याशीं संगती करावी.

कोणा गृहस्थांस कोणाचें घरीं जाण्याचें आवडत नाहीं पण ते मोठे मनाचे थोर आणि सद्गुणी असतात असें आपणास समजलें ह्मणजे आपण ताठा न बाळगतां त्यांचेकडे जाऊन त्यांची संगती करावी व त्यांपासून आपणास उपयोग करून घ्यावा.

## नोटिसा.

नहेरनाथ वलद मुर्जनगनाथ गारपगारी रहाणार मौजे दधानें तालुके मलगाव यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं माझी बहीण नामें गंगी ही तुमची बायको असून सुमार सहा वर्षें झालीं ती माझे एथेंच आहे. सहा वर्षांपूर्वी प्रथम जेव्हां तुह्मास तुमचे पुरुषत्वाचा भरवसा नव्हता तेव्हां तुह्मी तिजबद्दल फार कतही करून देण्यास तयार झाला होता पण इतक्यात तुह्मास कोणी फंद दिल्यावरून तें काम तुह्मी एक वर्षाच्या मुदतीवर लोटलें त्या गोष्टीस ५।६ वर्षें होऊन गेलीं पण अजून तुह्मी आपली बायको नेत नाहीं व सोडचिठीही देत नाहीं. ह्मणून मुद्दाम ही नोटिस दिली आहे. ही पावल्यापासून १९ दिवसांत तिला खाण्या खर्चास लागलेले दरसाल ५० रु. प्रमाणे ३०० रुपये आणून द्यावे व तुह्मी आपले बायकोला घेऊन जावें किंवा सोडचिठी द्यावी. वर दिलेल्या मुदतींत या दोहींतून एकही तुह्मी न केलें तर फिर्याद करून रुपये घेतले जातील व मुलीचा दुसरा घरठाव रीतीप्रमाणें करून दिला जाईल. कळावें, तारीख १३ माहे फब्रुवारी सन १८७९ इसवी.

(सही) पुरणनाथ वलद प्राणनाथ गारपगारी वस्ती अंदुरें तालुके बाळापुर निशाणी खुद्द हातची

### नोटिस.

अबदुल रहेमान वलद सेखम्हनु मुसलमान व गोपाजी वलद जानजी माळी इंगळे व शिवाजी वलद कमळाजी माळी खिरसागर व रखमाई मर्द महादु आवळे रहाणार कसबे पातुर शेखबाबू यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं माझा बाप महादु आवळे हा असमास दोन महिने झाले मयत झाला त्याचा वारस मी असोन त्याचे संबंधानें तुह्मास कळवितो त्या गोष्टी येणेंप्रमाणें:—

१०० अबदुल रहेमान याजकडे शंभर रुपये येणें आहेत ते.

९० गोमाजी वलद जानजी माळी इंगळे यास ९० रुपये किमतीचा एक बैल दिला आहे तो.

४० शिवाजी वलद कमळाजी खिरसागर याजकडे रुपये चाळीस.

याप्रमाणें सदर्हू तीन इसमांपासून सदर्हू रुपये घेणें आहेत ते रुपये आमचे परवानगी शिवाय रखमाईस देऊं नये अगर दिल्यास तुह्मा जवळून सदर्हू रुपये फिर्याद करून घेतले जातील.

रखमाई ही माझी सावतर आई असून इची कोणतेच प्रकारची मालकी होत नाहीं फक्त चांगल्या रीतीनें राहिल्यास अन्न वस्त्र देण्यास मी कबूल आहे ते घेण्यास खुशी असल्यास घ्यावें मर्जी नसल्यास मला जरूर नाहीं. व घरांतील मालाचा अफरातफरा करशील यास्तव मी स्वतः घरास कुलुप लावून बंद केलें आहे. माझे खुशीनें व मनोदयाप्रमाणें वागल्यास सदर्हू लिहिल्याप्रमाणें बरें होईल. कळावें, तारीख ८ फेब्रुवारी सन १८७९ इसवी,

(सही) लक्ष्मण वलद महादु आवळे वस्ती कसबे पातुर शेखबाबु निशाणी खुद्द हातची ंघ

### नोटिस.

तानाजी वलद गंगाराम खेडे जात कुणबी रहाणार मनतगाव तालुके खामगाव यास पुरणाजी वलद भिवाजी टोंगळ जात कुणबी रहणार अंदुरें तालुके बाळापुर याजकडून नोटिस देण्यांत येते कीं माझी बहीण नामे सोनी ही तुमची बायको असून सुमार पांच सहा वर्षें तिला तुह्मी आपले घरीं नेलें नाहीं सबब माझे एथेंच आहे व तुह्मीही रक्तपित्ती महारोगानें आजारी आहा. आतां या नोटिशीनें इतकेंच कळविणें आहे कीं ही नोटिस पावल्या पासून १९ दिवसांचे आंत गेले सहा वर्षांत अन्न वस्त्राबद्दल खर्च दरसाल ५० रुपये प्रमाणें तीनशें रुपये झाला आहे ते रुपये आणून द्यावें व लग्नाची फारकती द्यावी ह्मणजे तिचा दुसरा घरठाव करून देण्यास बरें पडेल कारण तुह्मास आतां तिचा उपयोग राहिला नाहीं सदर्हू दिलेल्या मुदतींत त्या दोन्ही गोष्टी तुह्मी केल्या नाहींत तर रीतीप्रमाणें फिर्याद करून रुपये घेतले जातील. कळावें तारीख १० माहे फेब्रुवारी सन १८७९ इसवी.

(सही) पुरणाजी वलद भिवाजी टोंगळ दस्तुर खुद्द.

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.